दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... ©email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२४० | सोमवार, दि.२३ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

D.S.Nagargoje 8908165555 9175606738
A.S.Nagargoje 9284872700 8007003550
बालाजी बॅटरी हाऊस
सेल्स अॅण्ड सर्व्हीसेस
आमच्याकडे सर्व प्रकारच्या बॅटरी योग्य दरात मिळतील.
पत्ता : काकु-नाना हॉस्पिटल समोर, जालना रोड, बीड.

## संपादकीय

### नशाबाजीविरोधात लढ्याची गरज

माणसाला अंतर्बाह्य पोखरणाऱ्या अमली पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण भयावहरित्या वाढले आहे. पंजाब राज्यात हे प्रमाण अधिक चिंताजनक आहे. देशभरात शाळकरी मुलांपासून ते थेट सेलिब्रिटींपर्यंत पसरलेल्या अमली पदार्थांच्या व्यसनाच्या भस्मासूराविरोधात लढण्यासाठी सरकार हतबल असताना पंजाबमधील वयाची शंभरी पार केलेले जागतिक किर्तीचे धावपटू फौजा सिंह हे नुकतेच अमली पदार्थांविरोधातील जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या पदयात्रेत सहभागी झाले, हा अंधारात पसरलेला प्रकाशाचा झोत म्हणावयास हवा. गेल्या अनेक वर्षांत पाकिस्तानच्या सीमेला खेटून असलेला पंजाब नशिल्या पदार्थांच्या व्यसनाने पोखरला गेला आहे.

# मराठवाड्यातील प्रकल्पांमधील पाणीसाठा ८३ टक्क्यांवर

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठवाड्यातील ८७९ प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा ८३ टक्क्यांवर आहे. त्यामध्ये मोठ्या प्रकल्पातील ९० टक्के असलेल्या उपयुक्त पाणीसाठ्यासह मध्यम प्रकल्पातील ७८ टक्के, लघु प्रकल्पातील ६७ टक्के, गोदावरी नदीवरील बंधाऱ्यांमधील ७५ टक्के तर तेरणा, मांजरा, रेना, नदीवरील बंधाऱ्यांमधील ८९ टक्के उपयुक्त पाणीसाठ्याचा समावेश आहे.**

मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पांपैकी जायकवाडी प्रकल्पात ९३ टक्के, येलदरीत ९५ टक्के, सिद्धेश्वरमध्ये ७९ टक्के, माजलगावमध्ये ७५ टक्के, मांजरामध्ये ९४ टक्के, ऊर्ध्व पैनगंगामध्ये ९२ टक्के, निम्न तेरणामध्ये ९८ टक्के, निम्न मनारमध्ये ८६ टक्के, विष्णुपरीत ८८ टक्के, निम्न दुधनामध्ये ६७ टक्के तर सीना कोळेगाव प्रकल्पात ९० टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. ७५ मध्यम प्रकल्पांपैकी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १६ प्रकल्पात ६७ टक्के, जालन्यातील ७ प्रकल्पात ६३ टक्के, बीडमधील १६ प्रकल्पात ९० टक्के, लातूरमधील आठ प्रकल्पात ७५ टक्के, धाराशिवमधील १७ प्रकल्पातील ७९ टक्के, नांदेड मधील नऊ प्रकल्पात ८७ टक्के, परभणीतील दोन प्रकल्पात ८६ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली. दरम्यान, मराठवाड्यातील ७५१ लघु प्रकल्पांपैकी छत्रपती संभाजीनगर व जालना पान २ वर



### दहा लघु प्रकल्प जोत्याखाली

मराठवाड्यातील जालन्यातील दोन, बीड व लातूर मधील प्रत्येकी एक व धाराशीवमधील सहा मिळून असे दहा लघु प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली आहे. याशिवाय जालना जिल्ह्यातील एका मध्यम प्रकल्पातील पाणीसाठाही जोत्याखाली असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.

## थोडक्यात...

### पंकजा मुंडेंनी मानले आभार

मुंबई–फडणवीस सरकारमध्ये मंत्रीपदी वर्णी लागल्यानंतर पर्यावरण, हवामान बदल आणि पशुधनविकास ही खाती पंकजा मुंडे यांच्याकडे देण्यात आली आहेत. त्यानंतर त्यांनी समाज माध्यमांतून पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

### शिंदेंकडून माझ्यावर नवी जबाबदारी–सिरसाट

संभाजीनगर–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्यावर नवी जबाबदारी टाकली आहे. मला सामाजिक न्याय खात्याची जबाबदारी दिली आहे, अशी प्रतिक्रिया संजय शिरसाट यांनी दिली. जमीन बळकविण्याच्या कामांना थांबविण्याकडे माझं लक्ष असणार आहे. कोणत्याही पक्षाचा असो, त्यांच्यावर कारवाई केली जाईल. दुसऱ्याची जमीन बळकावणं गुन्हाच आहे. सिल्लोड असो की छत्रपती संभाजीनगर जिल्हा जमीन बळकवणाऱ्यांचा बंदोबस्त होईल, असा मोठा इशारा संजय शिरसाट यांनी दिला.

### सर्वपक्षीय ओबीसी नेत्यांचा भुजबळांना पाठींबा

मुंबई : ओबीसी बहुजन आघाडीची बैठक रविवारी मुंबईतील महिला विकास मंडळ या ठिकाणी पार पडली. बैठकीत ओबीसी नेत्यांनी छगन भुजबळ यांच्या भूमिकेवर पाठिंबा दर्शविला आहे. भुजबळ यांना मंत्री मंडळातून डावलल्यानंतर ओबीसी नेत्यांची ही पहिली बैठक पार पडली. या बैठकीच्या समारोपवेळी छगन भुजबळ आगे बढ़ो हम तुम्हारे साथ असा एकमुखाने नारा आणि घोषणा दिल्या आहेत.

### फडणवीस, शिंदेंसोबत अर्थसंकल्प तयार करणार– अजित पवार

बारामती : येत्या ३ मार्चला राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार आहे. यात अर्थसंकल्प सादर केला जाणार असून देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंना विश्वासात घेऊन तो तयार करणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी म्हटले आहे. बारामतीत ते बोलत होते. सोमवारी आपण खात्याचा कारभार स्वीकारणार, असेही ते म्हणाले.

# खातेवाटपानंतर आता पालकमंत्री पदावरुन रस्सीखेच!


## बीडमध्ये मुंडे बहिण–भाऊ, संभाजीनगरात सिरसाट–सावेंमध्ये स्पर्धा

**बीड । प्रतिनिधी**

**मंत्रिमंडळ विस्तारानंतर नाराजीनाट्य पहायला मिळाले. आता खातेवाटपानंतरही काही मंत्र्यांमध्ये नाराजीचा सुर असल्याचे दिसून येत आहे. तसेच पालकमंत्री पदावरुन आता महायुतीच्या मंत्र्यांमध्ये रस्सीखेच सुरु असल्याचे समजते. राज्यातील बऱ्याच जिल्ह्यात हीच परिस्थिती असून बीडमध्ये मुंडे बहिण–भाऊ, संभाजीनगरमध्ये मंत्री संजय सिरसाट आणि मंत्री अतुल सावे यांच्यात स्पर्धा आहे.**

विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याने मंत्री पदासाठी मोठी स्पर्धा होती. अनेक दिग्गजांना त्यातून वगळण्यात आले तर नविन चेहऱ्यांना संधी देण्यात आली. छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, सुधीर मुनगंटीवार, तानाजी सावंत, अब्दुल सत्तार, दिपक केसरकर यांच्यासह बऱ्याच नेत्यांना डावलण्यात आल्याने अनेकांनी उघडपणे नाराजी सुध्दा बोलून दाखवली. मंत्रिमंडळ विस्तारानंतर खातेवाटपानंतरही बऱ्याच मंत्र्यांना आपल्या पसंतीचे खाते न मिळाल्याने हिरमोड झाल्याचे दिसून आले. खातेवाटपानंतर आता पालकमंत्री पदावरुन मंत्र्यांमध्ये स्पर्धा सुरु झाली असून कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रसह मराठवाड्यातही पालकमंत्री पदासाठी रस्सीखेच होणार असल्याचे संकेत आहेत. कोल्हापुर, यवतमाळ, सातारा, नाशिक, जळगाव, संभाजीनगर, रायगड, बीड या जिल्ह्यात पालकमंत्री पदावरुन पेच निर्माण झाला आहे. शिंदे सरकारमध्ये बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे होते. आता मुंडे बहिण–भाऊ मंत्री झाल्याने बीडचे पालकमंत्री पद घेण्यासाठी दोघांमध्ये रस्सीखेच होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संतोष देशमुख खुन प्रकरण, पवनचक्की खंडणी प्रकरण, परळी पिकविमा घोटाळा यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांना पालकमंत्री पद देऊ नये यासाठी विरोधी नेत्यांकडून पडद्याआड मुख्यमंत्र्यांकडे रेटा लावला जात असल्याची चर्चा आहे.






### बीडच्या पालकमंत्री पदावरुन होणार राजकारण

बीडचे पालकमंत्री पद हे मुंडे बहिण–भावाला देऊ नये यासाठी जिल्ह्यातील काही नेते कामाला लागले असल्याची चर्चा असून बीडचे पालकमंत्री हे मुंडे बहिण–भावापैकी कोणालाही द्यावे यासाठी सुध्दा मुंडे समर्थक आग्रही असल्याचे दिसते. त्यामुळे बीडच्या पालकमंत्रीपदावरुन राजकारण होणार असल्याचे संकेत आहेत.

### दर तीन महिन्याला मंत्र्यांच्या कामाचा आढावा

मंत्रिमंडळासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निकष ठरवले आहेत. ते निकष काही आहे, त्याची माहिती शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी दिली. मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या कामांचा आता दर तीन महिन्यांनी आढावा घेतला जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक मंत्र्यास काम करणे गरजेचे आहे. जे शिवसेनेचे मंत्री काम करणार नाही त्यांची खाती काढून घेतले जाणार आहे. म्हणजेच ज्यांची कामगिरी चांगली नसले त्यांचे मंत्रिपद जाणार आहे, असे म्हटले आहे.

# राजकीय दबावाला बळी पडाल तर घरी जावे लागणार

## पदभार स्विकारताच पोलिस अधिक्षक नवणीत कांवत यांचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

**पोलिस अधिक्षक नवणीत कांवत यांनी शनिवारी रात्री उशिरा पदभार स्विकारला असून ते आता कामाला लागले आहेत. रविवारी त्यांनी पोलिस अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन राजकारण्यांच्या सांगण्यावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना गंभीर इशारा दिला आहे. जे अधिकारी व कर्मचारी यापुढे राजकीय दबावाला बळी पडतील त्यांच्यावर कारवाई केली जाणार असून त्यांना थेट घरी जावे लागणार असल्याचा स्पष्ट इशारा यावेळी कांवत यांनी दिला आहे.**




संतोष देशमुख खुन प्रकरण, पवनचक्की खंडणी प्रकरण, पिकविमा घोटाळा यामुळे बीड गेल्या काही दिवसापासून राज्यात चर्चेत आहे. यातून तत्कालीन पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३बदली केली. त्यांच्या जागी संभाजीनगरहून नवणीत कांवत पान २ वर

# स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सर्व पक्ष, समाज आणि संघटना एकत्र येणार

## आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आज सामूहिक बैठक

**बीड । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अमानवीय पध्दतीने निघृण हत्या केल्याच्या प्रकरणात न्याय मिळविण्यासाठी सर्व पक्ष, समाज व संघटना आणि एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी सोमवारी (दि.२३) रोजी बीड शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे सकाळी १० वा. सामूहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**

मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. अतिशय निघृणपणे स्व.देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल १४ दिवस उलटूनही स्व.देशमुख यांचे मारेकरी आणि या प्रकरणाचा सुत्रधार अद्याप मोकाट आहेत. इतके पान २ वर

# अभिनेता अल्लू अर्जुनच्या घरावर हल्ला

**हैदराबाद । वृतसंस्था**

**दाक्षिणात्य अभिनेता अल्लू अर्जुनच्या हैदराबाद येथील घराची विद्यापीठाच्या संयुक्त कृती समितीच्या (जेएसी) सदस्यांनी तोडफोड केली. याप्रकरणी पोलिसांनी ८ जणांना अटक केली आहे. दरम्यान, तोडफोडीच्या घटनेवेळी अल्लू अर्जुन त्याच्या घरी उपस्थित नव्हता.**

उस्मानिया विद्यापीठातील पदाधिकाऱ्यांनी अल्लू अर्जुन नेत्यांनी अभिनेत्याच्या घरात जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी सध्या थिएटरमध्ये झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणातील पान २ वर


# अमित शाहांविरोधात काँग्रेसचा एल्गार

## राजीनाम्यासाठी २६ जानेवारीपर्यंत देशव्यापी आंदोलनाची घोषणा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँग्रेस पक्ष पुढील वर्षी २६ जानेवारीपर्यंत देशभर प्रचार मोहीम राबवणार आहे. २४ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. २७ डिसेंबर रोजी कर्नाटकातील बेळगावात मोठी रॅली होणार आहे.**

काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी रविवारी सांगितले की, ''संसदेच्या अधिवेशनात राज्यघटनेवर झालेल्या चर्चेदरम्यान अमित शाह यांनी आपल्या भाषणात बाबासाहेबांचा अपमान केला आहे. शहा यांच्या वक्तव्यामुळे सर्वजण दुखावले आहेत. आजपर्यंत पान २ वर



# पंतप्रधान मोदींचा कुवेतमधील सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मान

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुवेत दौऱ्याचा रविवार (दि.२२) दुसरा आणि शेवटचा दिवस होता. कुवेतचे अमीर शेख मेशाल अल–अहमद अल–जाबेर अल–सबाह यांच्या निमंत्रणावरून ते कुवेतमध्ये आहेत. चार दशकांतील भारतीय पंतप्रधानांची ही पहिलीच कुवेत भेट आहे. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कुवेतचे अमीर शेख मेशल अल–अहमद अल–जाबेर अल सबाह यांच्याकडून द ऑर्डर ऑफ मुबारक द ग्रेट हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कुवेतमध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गार्ड ऑफ ऑनर देत भव्य स्वागत पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२१ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १.०० क्विंटल | ३,१५० | ३,१५० | ३,१५० |
| ज्वारी/हायब्रिड: १९.०० क्विंटल | २,३१० | २,५०३ | २,४०६ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,४५० | ७,४५० | ७,४५० |
| उडीद : ११.०० क्विंटल | ६,३०० | ७,३०० | ६,७४० |
| बाजरी: ५.५० क्विंटल | २,०८१ | २,९५७ | २,६५२ |
| मुग : २.०० क्विंटल | ७,३०० | ७,३०० | ७,३०० |
| सोयाबीन: १००.०० क्विंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

# खरचं धनंजय मुंडे दोषी आहेत का?

## सुज्ञ नागरिकांचा सवाल: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादांकडून तुर्तास क्लिनचिट?





**बीड । प्रतिनिधी**

**सरपंच संतोष देशमुख खुन प्रकरण व परळी पिक विमा घोटाळ्यावरुन अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र त्यांची अगोदर मंत्रीपदी आणि नंतर त्यांना चांगले खाते देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादांनी तुर्तास तरी क्लिनचिट दिल्याचे दिसत आहे. या प्रकरणात मुंडे खरचं दोषी आहेत का? असा प्रश्न आता सुज्ञ नागरीक उपस्थित करीत आहेत. तर मुंडे यांना या प्रकरणात विनाकारण विरोध म्हणून गुंतवण्यात येत आहे का? याचाही विचार आता सर्वसामान्य नागरीकांना करावा लागणार आहे.**

संतोष देशमुख खुन प्रकरणावरुन धनंजय मुंडे यांना टार्गेट करण्यात आले. ते मंत्री होऊ नयेत यासाठी पडद्याआड मोठ्या हालचाली झाल्या. आ. जितेंद्र आव्हाड, आ. सुरेश धस आणि आ. संदिप क्षीरसागर यांनी थेट हल्लाबोल केला. याच मुद्दयावरुन सर्वपक्षीय नेत्यांनी अधिवेशन सुध्दा गाजवले. विरोध असताना मुंडे मंत्री झाले, त्यांना चांगले खातेही मिळाले, आता त्यांची मंत्रिमंडळातून हाकालपट्टी करण्यासाठी काही नेत्यांनी मोहिम उघडली आहे की काय अशी शंका आता मुंडे समर्थकांना आहे. तर आ. सुरेश धस यांनी या घटनेतील आरोपींचा अक्का कोण? या मुद्दयावर अधिवेशन गाजवले. तसेच त्यांनी परळी पिक विमा घोटाळ्यावरुनही मुंडे यांना नाव न घेता टार्गेट केले. बरेच नेते आरोप करीत असल्याने कुठे तरी धनंजय मुंडे हे दोषी आहेत का? असा प्रश्न सामान्य नागरीकांना पडला होता. देशमुख खुन प्रकरण, खंडणी प्रकरणावरुन विरोध असताना मुंडेंवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विश्वास दाखवत मंत्री केले, पुढे चांगले खातेही दिले. त्यामुळे मुंडे यांना तुर्तास तरी फडणवीस आणि अजितदादांनी क्लिनचिट दिली असल्याचे पान २ वर

### जे दोषी, त्यांना शिक्षा हवीच!

संतोष देशमुख खुन प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्यांना शिक्षा व्हायलाच हवी, ही तर जनभावना असून मग यात कोणीही सहभागी असतील तर त्यांना मोकाट सोडता कामा नये. गुंडगिरी करणारे आणि त्यांना साथ देणारे सुध्दा शोधून काढून त्यांनाही शिक्षा व्हावी, अशी मागणी आता जोर धरु लागली आहे.

### धनंजय मुंडेंची आज पत्रकार परिषद

गेल्या काही दिवसापासून वाल्मिक कराड यांच्या माध्यमातून विरोधकांकडून मंत्री धनंजय मुंडे यांना टार्गेट केले गेले. वेगवेगळे आरोप त्यांच्यावर केले गेल्यावर सोमवारी ते पत्रकार परिषद घेऊन विरोधकांच्या आरोपांचा समाचार घेणार आहेत.

### अॅड. बाळासाहेब कोल्हे सरकारी वकील नियुक्त

संतोष देशमुख खुन प्रकरणी सरकारी वकील म्हणून अॅड बाळासाहेब कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर दुसरीकडे संपुर्ण प्रकरणाचा तपास जेष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची नेमणुक करावी, अशी मागणी आ. सुरेश धस यांनी केली आहे.

## अग्रलेख

# नशाबाजीविरोधात लढ्याची गरज

माणसाला अंतर्बाह्य पोखरणाऱ्या अमली पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण भयावहरित्या वाढले आहे. पंजाब राज्यात हे प्रमाण अधिक चिंताजनक आहे. देशभरात शाळकरी मुलांपासून ते थेट सेलिब्रिटींपर्यंत पसरलेल्या अमली पदार्थांच्या व्यसनाच्या भस्मासूराविरोधात लढण्यासाठी सरकार हतबल असताना पंजाबमधील वयाची शंभरी पार केलेले जागतिक किर्तीचे धावपटू फौजा सिंह हे नुकतेच अमली पदार्थांविरोधातील जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या पदयात्रेत सहभागी झाले, हा अंधारात पसरलेला प्रकाशाचा झोत म्हणावयास हवा. गेल्या अनेक वर्षांत पाकिस्तानच्या सीमेला खेटून असलेला पंजाब नशिल्या पदार्थांच्या व्यसनाने पोखरला गेला आहे. राजकारणीही यात गुंतले असल्याचा आरोप होतो आहे. अलिकडेच भाजपच्या एका माजी आमदाराला या प्रकरणात अटकही करण्यात आली होती. केवळ पंजाबचीच ही अवस्था नाही तर अमली पदार्थ मिळत नाहीत असा कुठलाच परिसर भारतात शिल्लक नसेल. पंजाबमध्ये हा प्रश्न सर्वाधिक ज्वलंत आहे. याचे कारण अमली पदार्थांचे सेवन शाळकरी मुलांकडून होण्याचे प्रमाण तिथे अधिक आहे.

व्यसनाधीन तरुण पिढीला वाचवण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी घेतलेला पुढाकार पाहून या राज्यातील व्यसनाधिनताविरोधी मोहिमेने जोर पकडावा, अशी अपेक्षा आहे. रेडक्रॉसच्या पुढाकाराने पंजाब सरकारने हाती घेतलेली ही जनजागृती मोहीम कौतुकास्पद आहे. कोणताही मोठा सामाजिक बदल जनतेच्या सहभागानेच शक्य होऊ शकतो. विशेषतः अमली पदार्थांचा व्यापार हे देशासमोरील मोठे आव्हान असताना अशा मोहिमा केवळ राजकीय हेतूने आयोजित केलेल्या नसाव्यात, तर त्यांना व्यापक आंदोलनाचे स्वरूप प्राप्त व्हावयास हवे. अशा अभियानांना मिळालेल्या यशाचे मूल्यांकन होणेही गरजेचे आहे. केवळ प्रसिद्धी माध्यमांसमोर येणे इतकाच अशा आंदोलनांचा हेतू नक्कीच असू शकत नाही. या मोहिमेत केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर महिलांनाही सहभागी करून घेण्यात यावे, ही राज्यपालांनी केलेली सूचना अतिशय महत्त्वाची आहे. त्याचे कारण या समस्येचा सर्वाधिक मनस्ताप हा महिलांनाच अधिक सहन करावा लागतो. तिचा पती असो की मुलगा, त्याला नशेचे व्यसन लागताच उपचार करण्याची करून दुसरीकडे सुविधा निर्माण संपूर्ण कुटुंब त्या आगीत जळत राहते. देशाची युवा पिढी नशेच्या आहारी जाऊ लागली आहे. युवा पिढीचे नुकसान झाल्यास त्यापासून देशाचे सर्वात मोठे नुकसान असते.

सेलेब्रिटी लोकांच्या ड्रग्ज सेवनाकडे कानाडोळा करणे किंवा त्याबाबतीत नरमाईचे धोरण स्वीकारणे हे समाजात ड्रग्ज वापराचा फैलाव होण्यास तसेच जागतिक अमली पदार्थांच्या व्यापाराला मोठी चालना मिळण्यास प्रोत्साहन देण्यासारखे आहे. सेलिब्रिटींचे ड्रग्जसेवन हे जनतेच्या एकंदर दृष्टिकोनावर, मूल्यांवर व वर्तणुकीवर खूप प्रभाव पाडत असते. विशेषतः ज्यांना ड्रग्जच्या दुष्परिणामांविषयीची माहिती नसते अशा तरुणाईला ते अधिक भूरळ पाडते. गेली चार-पाच दशके सीमेपलीकडील पाकिस्तानमधून दहशतवाद पसरवण्याच्या उद्देशाने अमली पदार्थांचे साठे पंजाबमध्ये येत आहेत. तेव्हापासून फुटिरतावाद्यांना आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने पाकिस्तानची आयएसआय ही गुप्तहेर संघटना या कटाला कायमच मूर्त स्वरूप देत आली आहे. भारतात अमली पदार्थ विकून त्यातूनच मिळवलेल्या रकमेतून दहशतवादी कृत्ये घडवायची ही पाकिस्तानची जुनीच खोड आहे. अलिकडेच सीमा सुरक्षा दलाने पाकिस्तानच्या सीमेलगत भारतीय भागात ड्रोनच्या सहाय्याने अमली पदार्थ टाकण्याच्या प्रकाराचा पर्दाफाश केला होता. भारतात येणारे अमली पदार्थ बहुतांशी पंजाबच्या सीमेवरून येत असल्याने ही सीमा पूर्णपणे बंद करण्याची नितांत आवश्यकता आहे. इतकेच नव्हे तर पाकिस्तानला खेटून असलेल्या सर्वच राज्यांमध्ये ही खबरदारी घ्यावी लागेल हे कुणीही सांगेल. नेपाळमार्गेही अशीच तस्करी होत असते. हे सर्व ठाऊक असतानाही केंद्र सरकार या प्रश्नाकडे गांभीर्याने का पाहत नाही, हा एक सर्वांनाच छळणारा प्रश्न आहे. सुरक्षा दलांमध्येही तस्करीला साथ देणाऱ्या प्रवृत्ती असल्याने त्यांचाही शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची गरज आहे.

ेकिडे व्यसनाधीन लोकांवर पुनर्वसन केंद्रात मोठ्या प्रमाणावर उपचार करण्याची सुविधा निर्माण करून दुसरीकडे तस्करीला आळा घातला गेला तर ही देशव्यापी समस्या नियंत्रणात येऊ शकते. याची सुरुवात पंजाबपासून व्हायला हवी. फौजा सिंह यांनी पदयात्रेत सहभाग घेऊन यादृष्टीने पहिले पाऊल टाकले आहे. त्यापासून प्रेरणा घेत मोठ्या लढाईला सुरुवात करता येईल. प्रश्न फक्त तीव्र राजकीय इच्छाशक्तीचा आहे.

# बॅनरवर फोटो नसला म्हणजे काय झालं लाखो गरिबांच्या हृदयात माझा फोटो-छगन भुजबळ

**मुंबई । प्रतिनिधी**

**आपल्याला मंत्रिमंडळातून डावलल्यामागे काहीतरी मोठं गौडबंगाल असल्याचं मत ओबीसी नेत्यांनी बोलून दाखवलं असल्याची प्रतिक्रिया छगन भुजबळांनी दिली. मंत्री माणिकराव कोकाटे यांनी जरी त्यांच्या बॅनरवर आपला फोटो लावला नाही तरी लाखो गरिबांच्या हृदयात आपला फोटो असणं ही बाब पुरेशी आहे असंही भुजबळ म्हणाले. प्रकाश शेंडगे आणि इतर ओबीसी नेत्यांनी भुजबळांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर छगन भुजबळांनी माध्यमांशी संवाद साधला.**

राष्ट्रवादीचे मंत्री माणिकराव कोकाटेंच्या समर्थकांकडून नाशिकमध्ये बॅनरबाजी करण्यात आली. पण या बॅनरवर छगन भुजबळांचा फोटो गायब झाल्याचं दिसून आलं. त्याचवेळी भुजबळांचे कट्टर विरोधक सुहास कांदेंना मात्र बॅनरवर स्थान देण्यात आलं. त्यावर प्रतिक्रिया देतना भुजबळ म्हणाले की, लाखो गरिबांच्या हृदयात आपला फोटो असणे ही बाब माझ्यासाठी पुरेशी आहे. महायुती सरकारच्या नव्या मंत्रिमंडळातून छगन भुजबळांना डावलल्यानंतर आता ओबीसी नेते एकत्र आलेत. ओबीसी नेत्यांसोबत छगन भुजबळांची जवळपास एक तास चर्चा झाली. मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यानं नाराज असलेल्या भुजबळांनी कार्यकर्त्यांसोबत चर्चा करून भूमिका घेणार असल्याचं सांगितलं होतं. छगन भुजबळ म्हणाले की, मला मंत्रिमंडळाच्या बाहेर ठेवण्यामागे काहीतरी गौडबंगाल असल्याचं मत ओबीसी नेत्यांचं झालं आहे. ओबीसी समाजातील विविध नेत्यांनी भेट आपली भेट घेतली आणि त्यांनी आपल्यासोबत असल्याचं सांगितलं. तुम्ही बाहेर असल्याने आम्ही त्रस्त असल्याचंही ते म्हणाले.

# मंत्री उदय सामंत, संजय सिरसाट आज मस्साजोगमध्ये येणार

## सरपंच संतोष देशमुख कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेणार

**बीड । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्दयीपणे हत्या करण्यात आली. या घटनेचे पडसाद राज्यभर उमटले. दरम्यान सोमवारी (दि.२३ डिसेंबर) सकाळी दहा वाजता राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आिण सामािजक न्यायमंत्री संजय सिरसाट हे मस्साजोग येथे दाखल होणार असून देशमुख कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेणार आहेत अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी दिली.**

संतोष देशमुख यांच्या हत्या





प्रकरणाचे राज्यासह हिवाळी अधिवेशनातही पडसाद उमटले. या प्रकरणातील काही आरोपींना अटक करण्यात आले असून काही फरार आहेत. हिवाळी अधिवेशनांतर आज सोमवारी (दि.२३) राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत हे रत्नागिरी येथून हेलिकॉप्टरने तर सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट हे छत्रपती संभाजीनगर येथून मोटारीने मस्साजोग येथे सकाळी दहा वाजता येणार आहेत. यानंतर सरपंच संतोष देशमुख यांच्या पिडीत कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन करणार आहेत, अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी दिली.

# राज्याचा अर्थसंकल्प ३ मार्चला मांडला जाणार - अजित पवार

**बारामती । प्रतिनिधी**

**राज्यात याच महिन्याच्या ५ तारखेला महायुतीचे सरकार आले असून १५ डिसेंबरला मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. आता खातेवाटप देखील शनिवारी झाले असून अर्थसंकल्प कधी मांडणार, असा नवा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याबाबत अर्थमंत्री अजित पवार यांनी उत्तर दिले आहे. अजित पवार यांनी राज्याचा अर्थसंकल्प -२०२५ हा ३ मार्च रोजी सादर केला जाईल अशी माहिती दिली आहे. ते रविवारी (दि.२२) बारामतीत बोलत होते.**



राज्यात याच महिन्याच्या सुरूवातीला महायुतीचे सरकार आले असून अधिवेशनाच्या पूर्वसंधेला मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. मात्र खातेवाटप झाले नव्हते. पण ते देखील शनिवारी झाले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थ आणि राज्य उत्पादन शुल्क खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली. यानंतर अजित पवार ॲक्टिव्ह मोडमध्ये आले असून त्यांनी रविवारी पहाटेच बारामतीतील विविध कामांचा आढावा घेतला. यावेळी एका उद्घाटन समारंभात त्यांनी ३ मार्चला राज्याचा अर्थसंकल्प मांडला जाईल अशी माहिती दिली. ते म्हणाले, आचारसंहितेमुळे गेल्या दोन महिन्यात अनेक कामे थांबली आहेत. त्यांना आता गती द्यायची आहे. आता खातेवाटप झाले असून सर्वच जण न कामाला लागतील.

# पोलिसांनी काळ्या फिल्म लावलेल्या गाड्यांवर कठोर कारवाई करावी, एसपींनी गुन्हेगारी रोखावी-ॲड.देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात गुंडगिरी फोफावत आहे. या गुंडगिरीतून अनेक गुन्हे घडत आहेत.पोलिसांनी काळया फिल्म लावलेल्या काचा असलेल्या गाड्यांवर कठोर कारवाई करावी. गुंडगिरीतून अनेक गुन्हे घडत आहेत आणि अनेकांचे बळी जात आहेत. त्यामुळे एस. पी. नवनीत कावत यांनी याबाबत त्वरित आदेश द्यावेत. गुन्हेगारीवर रोख आणावी, असे आवाहन जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.**

जिल्ह्यातील गुन्हेगार पोलिसांना माहीत आहेत. याच सलोख्याने वाळू माफिया, गुटखा माफिया, खंडणीखोर, बोगसगिरी करणारे जन्म घेत आहेत. हे सर्व गुन्हेगार काळया काचाच्या गाडीतून फिरतात. डिजिटल नंबर प्लेट गाड्यांना लावतात. त्यामुळे पोलिसांनी बेकायदेशीर रीतीने चालणाऱ्या या गाड्यांवर कठोर कारवाई करावी. वाहनांवर कारवाई करत असताना ड्रायव्हरचे लायसन देखील निलंबित करावे. गुन्हेगारांमार्फत दहशतीचे वातावरण पसरवले जात असून याला अनेक जण कारणीभूत आहेत. यातून बीड जिल्ह्यात व्यवसाय निमित्त कोणीही येण्यास तयार नाही. जिल्ह्याची मोठ्या प्रमाणात बदनामी होत असून हे कुठेतरी रोखणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या पद्धतीने पाऊले उचलून जिल्ह्याची बदनामी थांबवण्यासाठी प्रत्येक सुज्ञ नागरिकांने पुढे येणे आवश्यक आहे. मस्साजोग येथे आज भेट दिल्यानंतर जी परिस्थिती तिथे दिसली, त्यावरून विदारक चित्र निर्माण होत असल्याचे दिसत आहे. त्याचबरोबर वाळू माफिया, गुटखा माफिया खंडणीखोर, बोगसगिरी करणारे जन्म घेत आहेत. प्रशासनातील अनेक लोक हप्तेखोरी मुळे या लोकांबरोबर जोडले गेले आहेत. समाजासाठी ही बाब विघातक आहे. हे सर्व रोखण्यासाठी आज समाजातील दक्ष नागरिकांनी पुढे येणे आवश्यक आहे. बीड जिल्हा बिहार झाल्याचे चित्र महाराष्ट्रात निर्माण झाले आहे. येथील गुंडगिरी देखील त्याचप्रमाणे आहे. नवीन एसपी काय करतात, याकडे देखील जनतेचे लक्ष लागले आहे, असेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# शिर्डीत होणाऱ्या भाजपाच्या महाअधिवेशनाला दिग्गज नेते राहणार उपस्थित-चंद्रशेखर बावनकुळे

## बारा जानेवारीला होणार अधिवेशन

**मुंबई । प्रतिनिधी**

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने भाजपने नियोजनाला सुरुवात केली असून, १२ जानेवारी रोजी शिर्डीत महाअधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनाला गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रचाराचा शंखनाद या महाअधिवेशनातून करण्यात येणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.**

शनिवारपासून भाजपची सदस्य नोंदणी मोहीम सुरू झाली. विधानसभा निवडणूकीअगोदर पुण्यातील बालेवाडी स्टेडियममधून विधानसभेचे रणशिंग फुंकण्यात आले होते. आता शिर्डीतून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रचाराचा शंखनाद होईल. या महाअधिवेशनाला १५ हजारांहून अधिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहतील. तालुका महामंत्रीदेखील 'या महाअधिवेशनाला बोलविण्यात येतील. या महाअधिवेशनाच्या निमित्ताने शिर्डीतच पक्षाची प्रदेश पदाधिकाऱ्यांची बैठकदेखील होईल, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली. भाजपकडून १५ दिवस संघटन पर्व आयोजित करण्यात आले असून, सदस्य नोंदणीवर भर देण्यात येईल. खासदार, आमदार, विधानपरिषद सदस्य व प्रमुख पदाधिकाऱ्यांना देण्यात आलेले टार्गेट पूर्ण झाले की नाही याचा आढावा घेण्याची जबाबदारी माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांच्यावर देण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

# भाचाच्या लग्नानिमित्त उद्धव-राज आले एकत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

**मागील काही वर्षात मुंबईतील राजकिय आणि मराठी बाणा टिकवून ठेवण्यासाठी शिवसेनेपासून वेगळे झालेले राज ठाकरे यांनी शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे यासाठी मनसे समर्थक आणि शिवसेना समर्थकांनी अनेक वेळा मोर्चे काढले. पण राजकिय दृष्ट्या एकत्र येऊ न शकलेले नाहीत. मात्र रविवारी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांच्या भाचाच्या लग्नानिमित्त एकत्र आल्याचे चित्र पहायला मिळाले.**



राज ठाकरे यांचे पत्नी कडील नातेवाईक असलेल्या आणि भाचाचे लग्न आज पार पडणार होते. त्यामुळे या लग्न सोहळ्याला उद्धव ठाकरे यांना आमंत्रित केले आहे का किंवा उद्धव ठाकरे हे उपस्थित राहणार का असा सवाल अनेक मनसे आणि शिवसेना उबाठाच्या कार्यकर्त्यांसह राजकिय क्षेत्रातील मंडळीना पडला होता. मात्र मुहूर्ताच्या वेळी उद्धव ठाकरे हे कुटुंबियांसह लग्नस्थळी पोहोचले. यावेळी उद्धव ठाकरे यांच्यासोबत त्यांच्या पत्नी रेश्मी ठाकरे याही सोबत होत्या. त्यावेळी राज ठाकरे हे लग्न कार्यात काही काळ व्यस्थ राहिल्याने सुरुवातीला या दोन नेते आणि भावांची भेट होऊ शकली नाही. परंतु अक्षता टाकण्याच्या काही वेळ आधी मनसे राज ठाकरे आणि शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट झाली. त्यानंतर राज ठाकरे, उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे या तिघांनी मिळूनच नव दांमप्त्यांवर अक्षता टाकत शुभाशिर्वाद दिले. विशेष म्हणजे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे दोघेच यावेळी बोलत होते. तेथे रश्मी ठाकरे याही राज ठाकरे यांना काही सांगण्यासाठी पोहोचल्या. त्यावेळी राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या पाठी असलेल्या रश्मी ठाकरे यांना पुढे येऊन सांगण्यास सांगितले. या तिघांना एकत्र पाहुन दोन भावांमध्ये राजकिय वैर वगळता कोणतेही वितुष्ट असल्याचे जाणवत नव्हते. तसेच त्यांच्या कौटुंबिक जिव्हाळा अद्याप कायम असल्याचे दिसून येत होते. राजकारण वेगळे आणि कोटुंबिक नाते वेगळे याचे भान अद्याप महाराष्ट्रातील अनेक कार्यकर्त्यांना आल्याचे दिसून येत नाही.

## पान १ वरून...

### मराठवाड्यातील प्रकल्पांमधील

जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये सर्वात कमी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ९८ लघु प्रकल्पात सर्वात कमी ५३ टक्के तर जालना जिल्ह्यातील ५७ प्रकल्पात ५७ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. त्यापाठोपाठ धाराशिव जिल्ह्यातील २०६ लघु प्रकल्पात ६२ टक्के ,हिंगोलीतील २७ प्रकल्पात ६४ टक्के,परभणीतील २२ प्रकल्पात ६७ टक्के, बीडमधील १२६ प्रकल्पात ७१ टक्के, नांदेडमधील ८० प्रकल्पात ७६ टक्के तर लातूर जिल्ह्यातील १३५ लघु प्रकल्पात सर्वाधिक सरासरी ८० टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

----------

### स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी

गंभीर प्रकरण असताना प्रशासनाकडून आरोपींच्या अटकेत चालढकल केली जाते आहे. आरोपी हे सत्तेच्या राजाश्रयात असल्याने त्यांना अटक केली जात नाही. सत्तेचा इतका दुरूपयोग जनसामान्यांना घातक ठरत चालला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आणि सर्व विचारांचे लोक एकत्र येऊन सर्वसमावेशक आंदोलन उभे करणार आहेत. दरम्यान या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित केलेल्या सामूहिक बैठकीला सर्व पक्ष, संघटना आणि सर्वच विचारांच्या लोकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

------------

### अमित शाहांविरोधात

अमित शहा किंवा पंतप्रधानांनी माफी मागितलेली नाही. काँग्रेस हा मुद्दा प्रजासत्ताक दिनापर्यंत म्हणजेच २६ जानेवारीपर्यंत देशभरात मांडणार आहे. दरम्यान, काँग्रेसची रणनीती पाहून भाजपनेही विरोधकांना उत्तर देण्याची तयारी सुरू केली आहे. पक्षाने आपल्या एससी/एसटी आघाडीला विधानसभेच्या सर्व जागांवर काउंटर मोहीम आखण्यास सांगितले आहे. यूपी भाजप एससी/एसटी मोर्चाचे अध्यक्ष रामचंद्र कन्नौजिया यांनी पुष्टी केली की विरोधकांचा पर्दाफाश करण्यासाठी पक्ष तळागाळात मोहीम सुरू करेल. ते म्हणाले, ''पक्ष दलितविरोधी घोषणा आणि विरोधी पक्षांच्या आधीच्या सरकारांनी उचललेली पावले अधोरेखित करेल.'' या महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या संघटनात्मक निवडणुकांनंतर लगेचच या प्रचाराला सुरुवात होईल, असे ते म्हणाले. ते म्हणाले की, मोर्चाच्या जिल्हा घटकांना दलितबहुल गावांमध्ये जाऊन भाजप सरकारने गेल्या १० वर्षात सुरू केलेल्या योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यास सांगण्यात आले आहे.

---------------

### राजकीय दबावाला बळी पडाल तर

यांची नेमणूक केली असून त्यांनी शनिवारी रात्री पदभार स्विकारला. त्यानंतर त्यांनी रविवारी जिल्ह्यातील पोलिस अधिकाऱ्यांची बैठक घेत आवश्यक त्या सुचना सुध्दा दिल्या आहेत. काम करताना राजकीय दबावाला बळी पडाल तर थेट घरी पाठवले जाणार असल्याचा कांवत यांनी इशारा दिला आहे. तसेच जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था कशी सुधारेल, याकडे लक्ष दिले जाणार असून जनतेकडून पोलिसांनी एक रुपया सुध्दा घेतल्याची माहिती मला मिळाली तर कारवाई केली जाणार असल्याचे कांवत म्हणाले. यावेळी पत्रकारांशी पोलिस अधिक्षक नवणीत कांवत यांनी संवाद साधला. मस्साजोग प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करण्यासाठी तातडीने पावले उचलली जातील, असे ते म्हणाले.

------------

### पंतप्रधान मोदींचा कुवेतमधील

केले. कुवेतमधील बायन पॅलेसमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना औपचारिक गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. यावेळी कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल सबाही उपस्थित होते. दरम्यान पंतप्रधान मोदी आणि कुवेतचे अमीर शेख यांच्यात कुवेतमध्ये द्वीपक्षीय बैठक देखील पार पडली. द्विपक्षीय व्यापार वाढवण्यासाठी तेलाच्या पलीकडे व्यापारात विविधता आणणे महत्त्वाचे आहे यावर पंतप्रधान मोदींनी भर दिला. ते म्हणाले की, भारत आणि कुवेत यांचे सखोल आणि ऐतिहासिक संबंध असून दोन्ही देशांमधील संबंध नेहमीच उबदार आणि मैत्रीपूर्ण राहिले आहेत. मोदी म्हणाले की, दोन्ही देश अनादी काळापासून एकमेकांसोबत व्यापार करत आहेत.

-----------

### खरचं धनंजय मुंडे

दिसून येत आहे. राहीला प्रश्न वाल्मिक कराड यांचा तर ते मुंडे यांचे कार्यकर्ते आहेत. कार्यकर्ता म्हणून आतापर्यंत कराड यांनी धनंजय मुंडे यांचे काम केले आहे. कार्यकर्त्याने चुकीचे काम केले तर त्यात नेत्याला दोषी कसे धरता येईल, तसेच वाल्मिक कराड हे सुध्दा नेते असून त्यांच्या कार्यकर्त्यांनी चुकीचे काही तरी काम केले तर त्यात ते दोषी असतील किंवा नसतील हे चौकशीत समोर येईलही. पण यात धनंजय मुंडे यांना गुंतवण्याचा डाव त्यांच्या विरोधकांनी केल्याचे गेल्या काही दिवसातील घडामोडींवरुन दिसून येत आहे. मुंडे बहिण-भाऊ बीडचे पालकमंत्री होऊ नयेत, यासाठी सुध्दा आता पडद्या आडून हालचालींना वेग आल्याचइे समजते. दरम्यान पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, जयदत्त क्षीरसागर, सुरेश धस, प्रकाश सोळंके, पंडीत हे सर्वच बीड जिल्ह्याचे नेतृत्व आहे. जर विरोध म्हणून एखादे नेतृत्व संपवून टाकण्याचा कुटील डाव आखला जात असेल तर हे जनतेला कदापी मान्य नसते. कारण असे नेतृत्व उदयास येण्यासाठी वर्षानुवर्ष प्रतिक्षा करावी लागते. त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांच्याबाबतीत सध्या तरी फडणवीस आणि अजितदादांनी क्लिनचिट दिल्याचे दिसते.

---------

### अभिनेता अल्लू अर्जुनच्या घरावर हल्ला

मृत महिलेच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची भरपाई देण्याची मागणी केली. यानंतर उस्मानिया विद्यापीठाच्या सदस्यांनी तोडफोड केली. यावेळी पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत उस्मानिया विद्यापीठाच्या संयुक्त कृती समितीच्या (जेएसी) आठ सदस्यांना अटक केली. त्यांना ज्युबली हिल्स पोलिस ठाण्यात नेण्यात आले. याप्रकरणी पोलिसांनी ८ जणांना अटक केली आहे. दरम्यान अल्लू अर्जुनच्या घरात तोडफोडीचा व्हिडिओ सोशल मीडिया व्हहायल झाला आहे. यामध्ये काही जण घराच्या कंपाऊंडमधील कुंड्या फोडल्याचे दिसत आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि.२३ डिसेंबर २०२४



## अकोला जिल्हा मराठी पत्रकार संघ राज्यात सर्वोत्कृष्ट रंगा अण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्काराने होणार सन्मान

**पुणे । प्रतिनिधी**

यंदाचा "संचार" कार रंगा अण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार अकोला जिल्हा मराठी पत्रकार संघाला जाहीर करण्यात आला आहे.. मराठी पत्रकार परिषदेच्या नुकत्याच पुणे येथे झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हा पत्रकार संघाला मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो.... यापुर्वी नाशिक, पुणे, सिंधुदुर्ग, बीड, नांदेड, भंडारा, रत्नागिरी आदि जिल्हा पत्रकार संघाना हा पुरस्कार दिला गेला आहे.जानेवारीच्या तिसरया आठवड्यात सेलू येथे होणारया कार्यक्रमात आदर्श जिल्हा आणि तालुका पत्रकार संघ पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.अकोला जिल्हा पत्रकार संघ गेली ५० वर्षे परिषदेशी जोडला गेलेला आहे.. पत्रकारांसाठी संघाच्यावतीने विविध उपक्रम राबविले जातात.. त्याच बरोबर मराठी पत्रकार परिषदेच्या सर्व उपक्रमात, आंदोलनात पत्रकार संघाचा कायम सहभाग असतो. पुरस्काराबद्दल अकोला जिल्हा पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी आणि जिल्ह्यातील पत्रकारांचे एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख यांनी अभिनंदन केले आहे.

# लोकसभेत १०० टक्के उपस्थितीसाठी मविआचे खासदार पहिल्या स्थानी

### भाजप आणि शिंदेसेनेचे प्रत्येकी एक खासदार



नवी दिल्ली : महाराष्ट्रातील विरोधी पक्षांच्या खासदारांनी लोकसभेत शंभर टक्के उपस्थित राहण्यात पहिला क्रमांक पटकाविला आहे. यात काँग्रेसचे सर्वाधिक सात आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन खासदारांचा समावेश आहे. भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा आणि अपक्ष प्रत्येकी एक अशा खासदाराची उपस्थिती शंभर टक्के राहिली. १२ खासदार संपूर्ण १९ दिवस सभागृहात हजर होते.

यात काँग्रेसच्या डॉ. वर्षा गायकवाड (उत्तर मध्य मुंबई), डॉ. नामदेव किरसान (गडचिरोली-चिमूर), डॉ. प्रशांत पडोळे (भंडारा-गोंदिया), प्रणिती शिंदे (सोलापूर), श्यामकुमार बर्वे (रामटेक), शोभा बच्छाव (धुळे) आणि डॉ. कल्याण काळे (जालना) यांचा समावेश आहे. माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे (बारामती) आणि धैर्यशील मोहिते (माढा) पूर्ण १९ दिवस हजर राहिले. भाजपचे अनुप धोत्रे (अकोला), शिवसेनेचे रवींद्र वायकर (उत्तर पश्चिम), माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेचे राजाभाऊ पराग वाझे (नाशिक) यांची लोकसभेत शंभर टक्के उपस्थिती राहिली.

### १९ दिवसांचे कामकाज

हिवाळी अधिवेशन आजपासून संपले आहे. २५ नोव्हेंबर ते २० डिसेंबर दरम्यान चाललेल्या या अधिवेशनात १९ दिवस कामकाज झाले. महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्रातून लोकसभेत सर्वाधिक काँग्रेसचे १३, भाजपचे ९, शिवसेना (उबाठा) ९. राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी) ८, शिवसेना ७, राष्ट्रवादी काँग्रेस एक आणि अपक्ष एक असे खासदार आहेत. यात महाराष्ट्रातील सर्वपक्षीय खासदारांपैकी सर्वाधिक उपस्थिती कुणाची होती याचा आढावा लोकमतकडून घेतला गेला.

### कोण किती दिवस उपस्थित?

महाराष्ट्रातील पाच खासदार १८ दिवस, तीन खासदार १७ दिवस, सात खासदार १६ दिवस, चार खासदार १५ दिवस, तीन खासदार १४ दिवस, एक खासदार १३ दिवस, दोन खासदार १२ दिवस आणि दोन खासदार १० दिवस उपस्थित होते. याशिवाय प्रत्येकी एक खासदार ९, ८ आणि ६ दिवस हजर होते. देशभरातील खासदारांची सरासरी उपस्थिती बघितली तर ती १६ दिवस असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. बारामुलाचे खासदार अब्दुल रशीद शेख आणि पंजाबचे अमृतपाल सिंग हे एकही दिवस लोकसभेत आले नाहीत. पंजाबचे राजकुमार छब्बेवाल हे फक्त एक दिवस सभागृहात आले. समाजवादी पक्षाचे प्रमुख आणि कन्नौजचे खासदार अखिलेश यादव सहा दिवस तर पंजाबचे माजी मुख्यमंत्री आणि जालंधरचे खासदार चरणजीतसिंग चन्नी पाच दिवस उपस्थित होते. प्रियंका गांधी-वाड्रा १६ दिवस, हेमामालिनी ८ दिवस, कंगना रणौत १८ दिवस लोकसभेत हजर होत्या.

# बस- दुचाकीच्या अपघातात शिक्षकाचा जागीच मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

भरधाव वेगाने जाणाऱ्या ( )एसटी बसने दुचाकीला जोराची धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीस्वाराला दुचाकीसह बसने जवळपास २०० फूट अंतरापर्यंत फरफटत नेले होते. ()यात जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकाचा जागीच मृत्यु झाला आहे. अपघात झाल्यानंतर महामार्गावर नागरिकांची गर्दी जमली होती.



गेवराई- शेवगाव राज्य महामार्गावरील महार टाकळी येथे सदरची दुर्दैवी घटना आज (दि.२२) रोजी घडली. या अपघातात महारटाकळी (ता. गेवराई) येथील फय्याज खान (वय ४५) असे मृत शिक्षकाचे नाव आहे. फैय्याज खान हे अर्ध पिंपरी याठिकाणी जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत होते. ते आपल्या गावालगत असलेल्या क्रिकेट मैदानावर रोज सकाळी क्रिकेट खेळण्यासाठी जात होते. दरम्यान नेहमीप्रमाणे आज देखील सकाळी क्रिकेट खेळण्यासाठी गेले होते. क्रिकेट खेळून झाल्यानंतर ते घराकडे निघाले होते. याच वेळी समोरून भरधाव वेगाने आलेल्या माजलगाव- पुणे या राज्य परिवहन महामंडळाच्या बसने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या भीषण अपघातात शिक्षक फय्याज खान जागीच ठार झाले. अपघाताची माहिती मिळताच चकलांबा पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. घटनेचा पंचनामा करून मृतदेह रुग्णालयात नेण्यात आला.

# पंजाबमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 'आप'ला यश

**चंदिगड । वृत्तसेवा**

दिल्लीतील विधानसभा निवडणुकीची जय्यत तयारी करणा-या आम आदमी पक्षासाठी मोठी खूशखबर आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी पुन्हा आपला करिष्मा दाखवून दिला आहे. पंजाबमध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाला मोठा विजय मिळाला आहे. या निवडणुकांमध्ये काँग्रेसनेही आपली ताकद दाखवून दिली आहे.



पंजाबमध्ये पाच महापालिका आणि ४१ नगर परिषदा व नगर पंचायतींच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्ये आपला घवघवीत यश मिळाले आहे. पंजाबमधील मतदारांनी पुन्हा भगवंत मान यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केल्याचा दावा पक्षाकडून केला जात आहे. आपला पाचपैकी तीन महापालिकांमध्ये यश मिळाले आहे. तर ४१ पैकी तब्बल ३१ नगर परिषदा व नगर पंचायतांमध्ये पक्षाने आपला झेंडा फडकावला आहे.

एकूण ९६१ पैकी ५२२ वॉर्डमध्ये आपचे उमेदवार विजयी झाले आहेत. पटियाला महापालिकेत आपने बहुमत मिळवले असून लुधियाना व जालंधरमध्येही सर्वाधिक जागा निवडून आल्या आहेत. मात्र, बहुमतापासून पक्ष दूर राहिला आहे. तर अमृतसह आणि फगवाडा महापालिकेत काँग्रेसच्या सर्वाधिक जागा निवडून आल्या आहेत. मात्र, बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे आप आणि काँग्रेस एकत्र येण्याची शक्यता आहे.

या विजयानंतर आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी आनंद व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटले आहे की, हा विजय प्रत्येक पंजाबीच्या स्वप्नांचा विजय आहे. तुम्ही विकास, प्रामाणिकपणा आणि पुढे जाणा-या पंजाबला मत दिले. नगर पंचायत आणि नगर परिषदेच्या निवडणुकीत आपच्या या विजयाबद्दल पंजाबमधील जनता, सीएम मान आणि आपच्या प्रत्येक कार्यकर्त्याला शुभेच्छा, असे केजरीवालांनी म्हटले आहे.

दरम्यान, पंजाबमधील या विजयाने केजरीवालांच्या आशाही पल्लवित झाल्या आहेत. दिल्लीतील निवडणूक पुढील काही दिवसांवर आली आहे. त्यामुळे हा विजय आपसाठी महत्वाचा मानला जात आहे. काही दिवसांपूर्वीच हरियाणामध्ये भाजपची सत्ता आली आहे. तर आता पंजाबमध्ये आपने ताकद दाखवली आहे.

# गणवेशाची जबाबदारी पुन्हा शाळा व्यवस्थापन समितीकडे

### राज्य सरकारचा निर्णय, आधीच्या योजनेचा उडाला बोजवारा, केसरकरांचा निर्णय रद्द

**नागपूर । प्रतिनिधी**

सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना करण्यात येणा-या गणवेश वाटपासंदर्भात महायुती सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. यापूर्वीच्या सरकारने सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवण्याची जबाबदारी स्वत: उचलली होती. मात्र, आता राज्य सरकारने ही जबाबदारी शालेय व्यवस्थापन समितीवर सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता शाळांकडून स्थानिक स्तरावर विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी केली जाईल. या अगोदर माजी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी एक राज्य, एक गणवेश योजनेचा निर्णय घेताना बचत गटाला कंत्राट दिले होते. आता निर्णय रद्द करण्यात आला.





राज्याचे माजी शालेय शिक्षणमंत्री एक राज्य एक गणवेश ही योजना सुरु करण्यात आली होती. या योजनेतंर्गत सुरुवातीला राज्यातील बचतगटांना गणवेश तयार करण्याचे काम देण्यात आले होते. मात्र, या गणवेशांचा निकृष्ट दर्जा आणि कमी-जास्त मोजमाप यामुळे प्रचंड वाद निर्माण झाला होता. त्यामुळे ही योजना वादात सापडली होती. एक राज्य, एक गणवेश या जुन्या योजनेवर निकृष्ट दर्जाचे कापड आणि शिलाईवरून राज्य सरकारवर टीका केली जात होती. तसेच वेळेत गणवेशही उपलब्ध होत नव्हते. अर्धे वर्षे उलटूनही अनेक विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले नव्हते. या पार्श्वभूमीवर आता राज्य सरकारने एक राज्य एक गणवेश योजनेत काही बदल केला आहे.

# खडकत येथील पोष्टाचे डाकपाल याने रक्कमेचा अपहार केल्यामुळे शिक्षा

**आष्टी । प्रतिनिधी**

मौजे खडकत ता.आष्टी जि.बीड येथील पोष्ट कार्यालयाचे डाकपाल आरोपी कांतीलाल अजिनाथ खरात यांना आष्टी न्यायालयाने पोष्टातील बँकेच्या पैशाचा अपहार केल्या बद्दल सहा महिन्याचा साधा करावास तसेच द्रवदंड रक्कम रुपये १०००/- द्रवदंड भरण्यास कसूर केला तर आरोपीने पंधरा दिवस साधी कैद ही शिक्षा भोगावी असा आदेश आरोपी विरुद्ध देण्यात आला आहे.

मौजे खडकत ता.आष्टी जि.बीड येथील पोष्ट कार्यालयामधील डाकपाल कांतीलाल अजिनाथ खरात हा दिनांक १४ जुलै २००३ ते २४ नोव्हेंबर २००३ या काळात डाकपाल म्हणून नौकरी करीत असताना त्याने बँकेचे खातेदार यांचे आर.डी. चे पैसे भरल्याची नोंद फक्त पासबुकात केली व सही शिक्के मारले, परंतु रक्कम रुपये ९२४४/- कॅश बुक मध्ये जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरून एकूण रक्कम रुपये ९२४४/- चा अपहार केल्या प्रकरणी आरोपी कांतीलाल अजिनाथ खरात यास सहा महिन्याचा साधा करावास तसेच द्रवदंड रक्कम रुपये १०००/- द्रवदंड भरण्यास कसूर केला तर आरोपीने पंधरा दिवस साधी कैद ही शिक्षा भोगावी अशी शिक्षा आष्टी येथील मा.न्यायाधीश एम. के.पाटील यांनी सुनावली आहे. या प्रकरणात तीन साक्षीदार तपासण्यात आले असून आरोपी विरुद्ध भा.द.वि. कलम ४०९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.सरकारी वकील ऍड चंद्रकांत अ. जावळे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीस शिक्षा सुनवण्यात आली असून सरकारी पक्षा तर्फे ऍड चंद्रकांत अ. जावळे यांनी काम पहिले. त्यांना पैरवी अधिकारी म.पो.ह.छाया साप्ते यांनी काम पहिले.

# मंत्री सामंत -शिरसाट आज मस्साजोगमध्ये

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत आणि समाज





कल्याण मंत्री संजय शिरसाठ हे केज तालुक्यातील मस्साजोग येथे सकाळी साडे दहाच्या सुमारास येणार असून या ठिकाणी येऊन ते संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची सांत्वन पर भेट घेणार आहेत. त्यानंतर ते परभणी कडे प्रयाण करणार असून परभणी येथे पोलीस कोठडीत मृत्यू पावलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेतील.

बीड येथे काही दिवसांपूर्वी मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली होती. त्यानंतर परभणी येथे पोलिसांनी अटक केलेले सोमनाथ सूर्यवंशी यांचाही पोलीस कोठडीत मृत्यू झाला. या दोन्ही ठिकाणी उद्योग मंत्री उदय सामंत आणि समाज कल्याण मंत्री संजय शिरसाठ हे भेट देणार आहेत. संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेऊन ते परभणीकडे प्रयाण करतील परभणी येथे सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन या ठिकाणीही कुटुंबियांचे सांत्वन करतील.

# ग्लोबल वॉर्मिंगमुळे जग हैराण, भारतात मात्र वाढली हिरवळ!

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

वाढत्या प्रदूषणाने आणि त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंगमुळे जग हैराण असताना भारतातील हिरवळ मात्र वाढत आहे. सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट २०२३ नुसार भारतातील वन आणि झाडांचे क्षेत्र २०२१ च्या तुलनेत २०२३ मध्ये १,४४५ चौरस किमीने वाढले आहे.



केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते देहरादून येथील वनसंशोधन संस्था येथे या रिपोर्टचे प्रकाशन करण्यात आले. या भारतीय वन सर्वेक्षण (एफएसआय) द्वारे हा अहवाल तयार केला जातो. उपग्रह रिमोट सेन्सिंग डेटा आणि क्षेत्र-आधारित राष्ट्रीय वनसूचीच्या आधारे देशातील वन आणि वृक्षांच्या संसाधनांचे एफएसआय सखोल मूल्यांकन करते. या अहवालानुसार देशातील एकूण वन आणि वृक्ष क्षेत्र ८,२७,३५७ चौ. किमी (देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २५.१७%) आहे. यामध्ये वन क्षेत्र ७,१५,३४३ चौ. किमी (२१.७६%) असून वृक्ष क्षेत्र १,१२,०१४ चौ. किमी (३.४१%) आहे.

एकूण वन आणि वृक्ष क्षेत्र असलेली राज्ये

१) मध्य प्रदेश ८५,७२४ चौ. किमी २) अरुणाचल प्रदेश ६७,०८३ चौ. किमी. ३) वन क्षेत्रात सर्वाधिक वाढ झालेली राज्ये ४) मिझोराम २४२ चौ.किमी ५) गुजरात १८० चौ.किमी. ६) महाराष्ट्र ६५,३८३ चौ. किमी. ७) ओडिशा १५२ चौ. किमी.

# खोलेश्वर महाविद्यालयात भा.शि.प्र.संस्था कर्मचारी आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही सामाजिक जाणीव संवर्धन करणारी संस्था म्हणून परिचित आहे. जानेवारी २०२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे संस्थेच्या शिक्षक त्रैवार्षिक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तत्पूर्वी संस्थेने शिक्षकांचे आरोग्य चांगले राहावे या दृष्टिकोनातून विद्यासभेच्या माध्यमातून संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

येथील खोलेश्वर महाविद्यालयात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या विद्यासभा व खोलेश्वर महाविद्यालयाच्या आरोग्य सुविधा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक संकुलातील सर्व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर भा. शि.प्र. संस्थेच्या केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. कल्पनाताई चौसाळकर या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. तर उद्घाटक म्हणून प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. कौस्तुभ कुलकर्णी व डॉ. गौरी देशपांडे यांची उपस्थिती होती. प्रमुख उपस्थिती मध्ये भा. शि. प्र. संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य राम कुलकर्णी, वर्षाताई मुंडे, आप्पाराव यादव तसेच खोलेश्वर जीनियस सीबीएससी स्कूलच्या शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव चौसाळकर, महाविद्यालयाचे उपप्रचार्य डॉ. बिभीषण फड , उपप्राचार्य डॉ. दीपक फुलारी आरोग्य सुविधा केंद्राचे प्रमुख डॉ. रवींद्र कुंबेफळकर , लोकमान्य टिळक विद्यालय पोखरी येथील मुख्याध्यापक संजय विभुते, खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विवेक जोशी, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे आदींची उपस्थिती होती. शिबिरात संकुलातील कर्मचाऱ्यांचे , , , स्थूलता स्क्रिनिंग तपासणी व आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. या प्रसंगी प्रमुख अतिथी डॉ.कौस्तुभ कुलकर्णी व डॉ. गौरी देशपांडे यांनी आरोग्याचे महत्त्व सांगून त्याची काळजी कशी घ्यावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले .

अध्यक्षीय समारोपात डॉक्टर कल्पनाताई चौसाळकर म्हणाल्या की , संस्था शिक्षकांच्या आरोग्याबाबत जागरूक आहे. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अनेक प्रकारचे ताणतणाव शिक्षकांवर असतात त्याचा परिणाम त्यांच्या अध्यापनावर होतो तसेच त्यामुळे अनेक आजारही बळवण्याची शक्यता निर्माण होते त्यामुळे शिक्षकांचे आरोग्य चांगले राहिले तर शिक्षक व विद्यार्थी या दोन्हींच्या समन्वयातून शिक्षण प्रक्रियेचा विकास चांगला होईल . यासाठी दि. २० डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२४ पर्यंत चालणाऱ्या या आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले .यावेळी खोलेश्वर जीनियस सीबीएससी स्कूलच्या शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव चौसाळकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरोग्य सुविधा केंद्राचे प्रमुख प्रा. डॉ. रवींद्र कुंबेफळकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अनिता बर्दापूरकर यांनी केले तर आभार प्रा. मोहिनी वेडे यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी संकुलातील प्राध्यापक ,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदींची उपस्थिती होती. विशेष म्हणजे या शिबिरात पहिल्याच दिवशी १५० कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी पूर्ण झाली. या शिबिरासाठी प्रा.डॉ. अजय दुबे, प्रा.विनय राजगुरू, प्रा.योगेश कुलकर्णी, प्रा. अनिता बर्दापूरकर, संगीता गोस्वामी यांनी विशेष परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### २ रे अखिल भारतीय मराठी

संमेलन होणार आहे. सन १९८३ साली अंबाजोगाईत झालेल्या ५७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रसिद्ध गझलकार सुरेश भट यांच्या गझल सादरीकरणाचा पहिला अभिनव उपक्रम अंबाजोगाईतच झाला होता. अंबाजोगाईच्या साहित्य संमेलनात प्रथमच गझलेला अंबाजोगाईकरांनी बहुमान मिळवून दिला होता. त्याच धर्तीवर आता हे गझल संमेलन अंबाजोगाईत आद्यकवींच्या भूमित होत आहे.

### हिवाळी अधिवेशनात महायुती

आरक्षणाचा लाभ देण्यासाठी शिंदे-फडणवीस-पवार यांच्या सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यामुळे आता पुन्हा सत्तेवर आलेल्या महायुती सरकारने आम्हाला दिलेला शब्द पाळून सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करून आरक्षणाचा तिढा संपवावा. कारण, धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यावर राज्यात अनेक ठिकाणी आंदोलन व उपोषण करण्यात आली. यात धनगड जमातीच्या एका कुटुंबातील सहा जणांचे धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी केली होती. यावर राज्य सरकारने ही मागणी पूर्ण करुन धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द ही केले. पुढे आरक्षणाच्या अंमलबजावणीचा मुद्दा उपस्थित झाला असून विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्याने तो तसाच राहिला. आता निवडणुका झाल्या आहेत. व महायुती पुन्हा एकदा सत्तेवर आली आहे. त्यामुळे धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मागणी आम्ही पुन्हा करीत आहोत. असे हजारे यांनी सांगितले.

# सोलापुरात माथाडींच्या आंदोलनाचा कांदा लिलावाला फटका

## चार दिवसांपासून ५० हजार क्विंटल कांदा पडून

सोलापूर : देशातील विविध बाजारपेठांमध्ये नवीन खरीप कांद्याची आवक वाढल्याने कांद्याचे दर पडले आहेत. कांद्याच्या दरात क्विंटलमागे २००० रुपयांपर्यंत दरात घसरण झाली आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकरी चिंतेत असतानाच सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माथाडी कामगारांचे आंदोलन सुरूच आहे. चौथ्या दिवशीही आंदोलन सुरूच राहिल्याने येथे चार दिवसापासून ५० हजार क्विंटल कांदा पडून आहे. यामुळे कांदा सडण्याची भीती कांदा उत्पादक शेतकरी व्यक्त करत आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी केलेल्या कथित आक्षेपार्ह विधानाच्या विरोधात देशभरात संताप व्यक्त होत आहे. राज्यातही अनेक ठिकाणी आंदोलन आणि निदर्शने करण्यात आली आहेत. तर सोलापुरच्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माथाडी कामगारांनी कामबंद आंदोलन पुकारले आहे. या आंदोलानाचा आजचा चौथा दिवस असून येथे लिलाव बंद आहेत. रविवारी (दि.२२)



बाजारसमिती बंद असल्यामुळे कांद्याचा लिलाव होणार नाही. तर सोमवारी (दि. २३) कांदा लिलाव होण्याची शक्यता आहे. यामुळे अनेक कांदा उत्पादक बाजार समितीमध्येच थांबून आहेत. तर येथे शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेला सुमारे ५० हजार क्विंटल कांदा लिलाव बंद असल्याने पडून आहे. गुरूवारी बाजार समितीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विधानाच्या विरोधात माथाडी कामगारांनी अचानकपणे काम बंद आंदोलन सुरू केले होते. यामुळे शेतकऱ्यांनी आणलेला कांदा बाजार समितीमध्ये उतरवून घेतला नाही. तो वाहनांमध्ये तसाच पडून होता. दुसऱ्या दिवशीही शुक्रवारी माथाडी कामगारांनी त्यांचे आंदोलन सुरूच ठेवले. पण कांदा उतरवून घेतला. शनिवारीही कांदा आवक होत राहिली. मात्र तिसऱ्या दिवशीही कांदा लिलाव झालाच नाही. तर रविवारी कृषी उत्पन्न बाजार समितीला साप्ताहिक सुटी असल्यामुळे सलग चौथ्या दिवशीही कांदा लिलाव बंद आहे. यामुळे येथे ५० हजार क्विंटल कांदा तसाच पडून राहिला आहे. त्यामुळे कांद्याचा दर आणखी कोसळण्याची भीती व्यक्त केली जात असून याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता आहे.

# शेतात मित्रकीटक वाढवा अन् किडींचा नायनाट करा!

पकाला नुकसानकारक किडींचा समूळ नायनाट करायचा असेल तर एकात्मिक कीड नियंत्रण ही काळाची गरज आहे. विशेषतः मित्र किडी जे पर्यावरणाला आणि पिकांना नुकसान न करता शत्रू किडींचे नियंत्रण करण्यास मदत करते.

मित्र किडींचे फायदे :नैसर्गिकपणे वाढणारे मित्र कीटक शत्रू कीटकांना शोधून मारतात. पीक, मनुष्य, प्राणी किंवा पर्यावरणावर मित्र कीटकांचा विपरीत परिणाम होत मित्र कीटकामुळे होणारे कीड नियंत्रण कायम स्वरुपाचे असते, त्यामुळे नुकसान कारक किडींचा उद्रेक होण्याची समस्या नसते. मित्र कीटकाप्रति शत्रू कीटकात प्रतिकार क्षमता निर्माण होत नाही.

जैविक नियंत्रणातील महत्त्वाचे मित्रकीटक : अ) परोपजीवी कीटक: हे मित्रकीटक नुकसानकारक किडींपेक्षा आकाराने लहान व चपळ असतात. किडीच्या अंगावर किंवा शरीरामध्ये राहून त्यांना ते हळूहळू खातात व मारतात. यामध्ये खालील किडींचा समावेश होतो.

ट्रायकोग्रामा : ट्रायकोग्रामा चिलोनीस ही मित्र किडीची प्रजाती जैविक महत्त्वाचे कार्य करते. या परोपजीवी कीटकांचा उपयोग ऊस, भात, मका व ज्वारीवरील खोडकिडी, कांडी कीड, कपाशीवरील बोंड अळी, भाजीपाला पिकांवरील शेंडा व फळे पोखरणारी अळी, घाटे अळी, डाळिंबावरील सुरसा, कोबीवरील चौकोनी ठिपक्याचा पतंग आदी किडींच्या नियंत्रणासाठी होतो. या परोपजीवी कीटकाची चिलोनस ब्लॅकबर्नी ही प्रजाती परिणामकारक आहे. वापर – ५० हजार अळ्या प्रति हेक्टर. गरजेनुसार तीन ते चार प्रसारणे करावीत.

एनकार्शिया : हे कीटक भाजीपाला, फळपिके, फुलपिके व पॉलिहाऊसमधील पिकांवरील रस शोषक किडी (उदा. पांढरी माशी, मावा, उसावरील लोकरी मावा) आदींच्या नियंत्रणासाठी उपयुक्त आहेत. रस शोषक किडींचा प्रादुर्भाव दिसू लागताच या मित्रकिडीचे प्रसारण करावे.

एपिरिकॅनिया : हे मित्रकीटक उसावरील नुकसानकारक पायरिला या किडीच्या पिल्ले व प्रौढ अवस्थांवर जगतात. या मित्रकीटकांमुळे पायरिलाचे अत्यंत प्रभावी नियंत्रण होते. वापर –



५० हजार अंडी किंवा ५००० कोष प्रति हेक्टर. गरजेनुसार पुढील प्रसारणे करावीत.

अपेंटॅलीस (कोटेशिया) : भाजीपाला पिकातील शेंडा व फळे पोखरणारी अळी, उसावरील खोडकीड, कांडी कीड, हेलिकोव्हर्पा आर्मिजेरा (घाटे अळी किंवा बोंड अळी) आदींच्या नियंत्रणासाठी या कीटकांचा उपयोग होतो. वापर – ५० हजार प्रौढ प्रति हेक्टर.

ब्रेकॉन : कापसावरील बोंड अळी, बटाट्यावरील पाकोळी, भेंडीवरील शेंडा व फळे पोखरणारी अळी, भात, मका व उसावरील खोड किडा, नारळावरील काळ्या डोक्याची अळी व अन्य पतंगवर्गीय किडींच्या नियंत्रणासाठी यांचा उपयोग होतो. वापर – ५० हजार प्रौढ प्रति हेक्टर.


कोपिडोसोमा : हे मित्रकीटक बटाट्यावरील पाकोळीच्या जैविक नियंत्रणासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. ५००० अळ्या प्रति हेक्टर गरजेनुसार चार ते पाच वेळा प्रसारणे करावीत.

एनासियस : हे परोपजीवी कीटक सध्या जैविक नियंत्रणातील महत्त्वाचे उदाहरण आहे. कपाशीमध्ये मोठ्या प्रमाणात उपद्रव करून नुकसान करणाऱ्या पिठ्या ढेकूण (मिलीबग) या किडीच्या नैसर्गिक नियंत्रणात या कीटकांचा मुख्य सहभाग होता.

मित्र किटकांचे संवर्धन कसे करावे? : रासायनिक कीटकनाशकाचा अति वापर टाळावा. खंड पद्धतीने कीटकनाशके फवारावीत. कमी हानीकारक व निवडक कीटकनाशके फवारावीत. जैविक कीटकनाशके वापरावीत. शेताच्या बांधावर भरपूर पराग कण असणारी फुलझाडे, सापळा पिके लावावीत, जेणेकरुन प्रौढ मित्र कीटकांना खाद्य मिळेल. शेतातील पालापाचोळा जाळणे थांबवावे, मुंग्याचे नियंत्रण करावे कारण हे मित्र किडींसाठी हानिकारक आहे.

# मोसंबीवरील 'डायबॅक' रोग : कारणे आणि उपाय

मराठवाडयातील मुख्य फळपिक मोसंबीवर डायबॅक रोगाचा प्रादुर्भाव नेहमीच आढळतो. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागते. या रोगाला 'आरोह' या नावाने सुद्धा ओळखतात. या रोगाची नेमकी कारणे कोणती आणि यावर पूर्णपणे नियंत्रण कसे मिळवावे याविषयी 'वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीतर्फे' शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक माहिती दिलेली आहे.



डायबॅक रोगाची कारणे :अयोग्य जमिनीची निवड: मोसंबीसाठी हलकी, मध्यम व चुनखडी विरहीत जमीन योग्य असते. परंतु, बहुतेक शेतकरी मोसंबीची लागवड ही अतिभारी, चुनखडीयुक्त किंवा क्षारयुक्त जमिनीत करतात. तसेच नदी, ओढयाच्या काठावरील काळया किंवा पोयटयाच्या जमिनीत झालेल्या लागवडीमुळे माती व पाण्याव्दारे होणाऱ्या बुरशीची वाढ झपाट्याने होते. जे डायबॅक रोग प्रसारास कारणीभूत ठरते.

पाण्याचा अयोग्य वापर : पाण्याचा अमर्यादित वापर यामुळे मोसंबी झाडाचा बुंधा सतत पाण्याच्या संपर्कात राहतो, यामुळे फायटोप्थोरा नावाच्या बुरशीचा प्रादुर्भाव व प्रसार झपाट्याने आणि मोठ्या प्रमाणावर होतो. पाण्याच्या संपर्कामुळे रोगट झाडापासून इतर झाडास रोगाची लागण होते. अति पाण्यामुळे जमिनीच्या खालच्या थरातील क्षार वर येते, जमिनीत हवा खेळती राहत नाही, जमिनीत कर्ब-नत्राचे प्रमाण असमतोल होते. जमीन अल्कली झाल्यामूळे सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता होऊन, झाडे कमजोर होतात, डायबॅक रोगाला सहज बळी पडतात.

चुकीच्या पद्धतीने आंतरमशागत : लोखंडी नांगर, किंवा ट्रॅक्टरव्दारे खोल व अगदी झाडाच्या बुंध्यापर्यंत नांगरणी, वखरणी केल्याने झाडाच्या मुख्य मुळयांना इजा होते. दुय्यम मुळया तुटणे किंवा उपसून बाहेर येणे, ब-याच वेळा झाड फाटणे, असे प्रकार घडतात आणि त्यामधून जमिनीव्दारे पसरणा-या रोग जंतुचा शिरकाव होऊन झाडे रोगग्रस्त होतात.

सेंद्रिय खताचा अभाव : शेणखत किंवा सेंद्रिय खताऐवजी रासायनिक खतांचा विशेषतः युरिया किंवा मिश्र खतांचा अनियंत्रित वापरामुळे काही अन्नद्रव्यांचा पुरवठा कमी तर काही अन्नद्रव्यांचे प्रमाण वाढून झाडाची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व झाड झपाट्याने डायबॅक रोगास बळी पडते.

पीक संरक्षणाचा अभाव : अजूनही बहुतेक शेतकरी मोसंबीवर पीक संरक्षण उपायाचा वापर केला जात नाही, त्यामुळे रोग/किडीची तीव्रता सतत वाढत जाऊन, नंतर झाड पूर्णपणे वाळते.

इतर कारणे : अयोग्य रोपांची निवड, बहाराच्या वेळी अवाजवी जास्तीचा ताण, एका वेळी दोन किंवा तीन बहाराची फळे धरणे, फळ धारणा अवस्थेत पाण्याचा ताण, गरजेनुसार योग्य प्रमाणात पाणी न देणे, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा अभाव व सूत्रकृमीचा प्रादुर्भाव यामुळे सुद्धा डायबॅक रोग होऊ शकतो.

डायबॅक रोग व्यवस्थापन : शेतात पाणी साचणार नाही याची काळजी घ्या, योग्य निचरा करा. प्रत्येक झाडास ठिबक सिंचनाद्वारे मर्यादित पाणी पुरवठा करा. बागेस नियमित देण्याच्या खताच्या मात्रा हया सेंद्रिय खतामधूनच द्या. उदा. शेणखत, रैलीमाल (७:१०:५) स्टोरामील, ब्लडमील, मासळी खत, निंबोळी पेंड, शेंगदाणा पेंड असेंद्रिय खतामध्ये अमोनियम सल्फेट, सिंगल सुपर फॉस्फेट अशा गंधकयुक्त खताचा वापर करावा. आंतरमशागत करतांना झाडाच्या मुळांना जखमा होणार नाहीत याची काळजी घ्यावी. मोसंबीवर एका वर्षात एकच बहार घ्या, तोच बहार नियमित ठेवा. झाडावर जास्तीत जास्त ५०० ते ६०० एवढीच फळे घ्यावी. रोगग्रस्त बागांना पाण्याचा जास्त ताण देऊ नये. साधारणतः: हलक्या जमिनीत १५ दिवस, मध्यम जमिनीत २१ दिवस व भारी जमिनीत ३० दिवस पाणी तोडावे व ताण तोडताना २५ टक्के, ५० टक्के व शेवटी १०० टक्के पाणी तीन ते चार दिवसांच्या अंतराने देऊन ताण मोडावा. रोगट झाडावरील सर्व फळे तोडून झाड निरोगी होईपर्यंत त्याच्या कायिक वाढीवर भर देणे आवश्यक आहे. झाडावर फळे असताना बागेस पाण्याचा ताण पडू देऊ नये.

पीक संरक्षण उपाय : १) डिंक्या रोगग्रस्त भाग एक इंच निरोगी भागासह खरडून काढावा. हा खरडलेला भाग १ ग्रॅ. मरक्युरिक क्लोराईड १ लिटर पाण्यात मिसळून धुऊन काढावा. २) वर्षातून दोन वेळेस (पावसाळयापूर्वी व पावसाळयांनंतर) २५ ग्रॅम कॉपरऑक्सीक्लोराईड १० लि. पाण्यात मिसळून प्रत्येक झाडाच्या खोडावर ओतावे. ३) २७ ग्रॅम मेटालेक्झील + १० लि. पाणी + स्टीकर यापासून तयार झालेला बोर्डोपेस्ट प्रत्येक झाडाच्या खोडावर एक मीटर उंचीपर्यंत लावावा. ४) जमिनीत सुत्रकृमी (निमॅटोड) असल्यास फ्युराडॉन नावाचे औषध प्रति झाडास १०० ग्रॅम जमिनीतून द्यावे. ५) बागेस नवीन पालवी येते वेळेस वर्षातून तीनदा आंतरप्रवाही कीटकनाशक, बुरशीनाशक व सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या फवारण्या करा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७७७ : कॅप्टन जेम्स कूकने प्रशांत महासागरातील किरितीमती बेटांचा शोध लावला.
१८९२ : भारताचे प्रसिद्ध लेखक बनारसीदास चतुर्वेदी यांचा जन्म.
१८९४ : पहिली वैद्यकीय परिषद कोलकत्ता येथे सुरु झाली.
१९०६ : रेजिनाल्ड फेसेंडेन याने प्रथमच एक कवितावाचन, व्हायोलिनवादन आणि एक भाषण यांचे रेडिओ प्रक्षेपण केले.
१९१० : स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जन्मठेपेची व काळ्यापाण्याची शिक्षा
१९२४ : अल्बानिया या देशाला स्वातंत्र्य मिळाले.
१९५१ : लिबीया हा देश (ईटलीकडून) स्वतंत्र झाला.
१९७९ : सोविएत युनियनने अफगणिस्तानवर आक्रमण केले.
१९८६ : भारतीय ग्राहक दिन.
१९८६ : दिल्ली येथील लोटस टेंपल भक्तांसाठी उघडण्यात आले होते.
१९८९ : मुंबई मध्ये देशातील पहिले मनोरंजन पार्क 'एस्सेल वर्ल्ड' उघडल्या गेले.
१९९९ : काठमांडू येथून नवी दिल्लीला येणार्या 'इंडियन एअरलाइन्स फ्लाईट ८१४' या विमानाचे तालिबानी अतिरेक्यांनी अपहरण करुन ते विमान अफगणिस्तानातील कंदाहार येथे नेले.
२००० : भारतीय बुद्धीबळ खेळाडू विश्वनाथ आनंद यांनी बुद्धिबळातील वर्ल्ड चैंपियनशिप आपल्या नावावर केली.
२००२ : दिल्लीच्या मेट्रोचा शुभारंभ झाला.
२०१४ : अटल बिहारी वाजपेयी आणि मदन मोहन मालवीय यांना भारतरत्न पुरस्कार देण्याची घोषणा करण्यात आली.
२०१६ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अरबी समुद्रात उभारल्या जाणाऱ्या छत्रपती शिवस्मारकाचे जलपूजन आणि भूमिपूजन करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

११६६ : जॉन – इंग्लंडचा राजा (मृत्यू: १९ आक्टोबर १२१६)
१८१८ : जेम्स प्रेस्कॉट ज्यूल – ऊर्जेच्या संक्रमणाविषयी सिद्धांत मांडणारे ब्रिटिश पदार्थ वैज्ञानिक (मृत्यू: ११ आक्टोबर १८८९)
१८८० : डॉ. भोगराजू पट्टाभी सीतारामय्या – स्वातंत्र्यसैनिक, इतिहासकार आणि काँग्रेसचे नेते. काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त त्यांनी लिहिलेला 'हिस्ट्री ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस' हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. (मृत्यू: १७ डिसेंबर १९५९)
१८९९ : पांडुरंग सदाशिव साने ऊर्फ 'साने गुरूजी' – नामवंत साहित्यिक, बालसाहित्यिक, समाजवादी नेते, समाजसुधारक व स्वातंत्र्यसैनिक. त्यांचे 'श्यामची आई' हे पुस्तक प्रकाशनक्षेत्रातील सर्व विक्रम मोडणारे ठरले आहे. (मृत्यू: ११ जून १९५०)
१९२४ : मोहम्मद रफी – पार्श्वगायक, पद्मश्री (१९६७) (मृत्यू: ३१ जुलै १९८० मुंबई)
१९३० : देशातील प्रसिद्ध लेखिका उषा प्रियंवदा यांचा जन्म.
१९४२ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, नाटककार इंद्र बानिया यांचा जन्म. १९५६: भारतीय चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध अभिनेते अनिल कपूर यांचा जन्म.
१९५७ : हमीद करझाई – अफगाणिस्तानचे राष्ट्राध्यक्ष
१९५९ : हिन्दी चित्रपट कलाकार अनिल कपूर यांचा जन्म.
१९८८ : भारतीय क्रिकेट खेळाडू पियुष चावला यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५२४ : वास्को द गामा – पोर्तुगीज दर्यावर्दी. अफ्रिकेला वळसा घालून युरोपातुन भारतात येण्याचा मार्ग त्याने शोधला.
१९६७ : बास्किन-रोबिन्स चे सहसंस्थापक बर्ट बास्कीन यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९१३)
१९७३ : पेरीयार ई. व्ही. रामस्वामी – स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि द्रविड चळवळीचे प्रणेते (जन्म: १७ सप्टेंबर १८७९)
१९७७ : नलिनीबाला देवी – आसामी कवयित्री व लेखिका (जन्म: २३ मार्च १८९८)
१९८७ : एम. जी. रामचंद्रन – अभिनेते व तामिळनडुचे मुख्यमंत्री (जन्म: १७ जानेवारी १९१७)
१९८८ : प्रसिद्ध लेखक जैनेंद्रकुमार यांचे निधन.
१९९३ : स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक पेरीयार ई. व्ही. रामस्वामी यांचे निधन. (जन्म: १७ सप्टेंबर १८७९)
१९९९ : नायकी इंक चे सहसंस्थापक बिल बोरमन यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९११)
२००० : कूपर कार कंपनीचे सहसंस्थापक जॉन कूपर यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२३)
२००५ : भानुमती रामकृष्ण – तामिळ व तेलगू चित्रपटांतील अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माती, गीतकार, संगीतकार, गायिका व लेखिका (जन्म: ७ सप्टेंबर १९२५).

# वाढत्या थंडीत गव्हावरील तांबेरा रोगाचे नियंत्रण

तापमानातील चढ-उतार, धुके, जास्त आर्द्रता आणि ढगाळ वातावरण यामुळे गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव वेगाने होण्याची शक्यता आहे. सध्याच्या वातावरणामुळे गव्हावर नारंगी तांबेरा आणि काळा तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून येतो. तांबेरा हा गव्हावरील अत्यंत हानिकारक रोग आहे. या रोगाकडे दुर्लक्ष केल्यास पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन उत्पादनात ८० ते १०० टक्क्यांपर्यंत घट येऊ शकते. गहू पीक दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास दाण्यांवर सुरकुत्या पडून त्याचे नुकसान होते.

नारंगी किंवा पानांवरील तांबेरा : हा तांबेरा पक्सीनिया ट्रीटीसीना या हवेद्वारा येणाऱ्या बुरशीच्या बीजाणूंमुळे होतो. १५ ते २५ अंश सेल्सिअस तापमान व पानावर किमान ३ तास दव साठल्यास या तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. प्राथमिक अवस्थेत नारंगी तांबेरा प्रामुख्याने पानाच्या वरच्या भागावर दिसून येतो. रोगाची लागण झाल्यावर पानावर गोलाकार ते अंडाकृती आकाराचे लहान लहान ठिपके दिसून येतात. अनुकूल हवामानात ठिपक्यांच्या जागी असंख्य बीजाणू तयार होऊन ठिपक्यांचा रंग नारंगी ते गर्द नारंगी दिसू लागतो. रोग्रस्त पानावरून बोट फिरवल्यास नारंगी रंगाची पावडर बोटावर दिसून येते.

काळा किंवा खोडावरील तांबेरा :रोगकारक बुरशी पक्सीनिया ग्रामिनीस ट्रीटीकीचा प्रसार हवेद्वारे वाहून आलेल्या बीजाणूंमुळे होतो. पानावर किमान ६ ते ८ तास ओलावा किंवा दव साचलेले असल्यास व तापमान १४ ते १५ अंश सेल्सिअस तापमान या रोगाच्या प्रसारास अनुकूल असते. तापमान ३० अंश सेल्सिअसपर्यंत गेल्यास रोगाचा प्रादुर्भाव अत्यंत झपाट्याने वाढतो. या रोगाच्या वाढीसाठी नारंगी तांबेरा रोगापेक्षा साधारण ५.५ अंश सेल्सिअसने जास्त तापमानाची आवश्यकता असते. रोगाचा प्रादुर्भाव पानाच्या खालच्या व वरच्या बाजूवर होतो. अनुकूल हवामानात खोडावर, देठावर, ओंबीवर तसेच कुसळावर देखील रोगाचा प्रादुर्भाव आढळून येतो. रोगग्रस्त पानांवर अंडाकृती ते लंब-गोलाकार आकाराचे हरितद्रव्य नष्ट झालेले लहान ठिपके दिसून येतात. कालांतराने त्या ठिकाणी बुरशीच्या विटकरी रंगाच्या बीजाणूची पावडर दिसून येते. ज्यामध्ये बुरशीचे असंख्य बीजाणू असतात. पिकाच्या बाल्यावस्थेत रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

रोगाचे नियंत्रण उपाय : तांबेरा रोगास प्रतिकारक्षम वाणांची पेरणी करावी. तांबेरा रोगाला प्रतिकारक्षम जाती: फुले समाधान, नेत्रावती, त्र्यंबक, फुले अनुपम, एन.आय.ए.डब्ल्यू. ३४, एम.ए.सी.एस. ६२२२, एम.ए.सी.एस. ६४७८. शिफारशीप्रमाणे पाण्याच्या पाळ्यांचे नियोजन करावे. सतत पाणी दिल्यास ओलावा टिकून राहून रोगांचे प्रमाण वाढते. रासायनिक खतांच्या मात्रा शिफारशीप्रमाणे द्याव्यात. शिफारशीपेक्षा जास्त प्रमाणात युरिया खताचा वापर केल्यास रोगाचा प्रादुर्भाव वाढू शकतो.



# एचसीपीएल कंपनीला लिंबागणेश येथे गतिरोधक बसविण्यात अडचण काय

## जिल्हा प्रशासनाची दिशाभूल,लिंबागणेशकरांच्या आंदोलनाचा इशारा





लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील येळंबघाट येथे ग्रामस्थांच्या मागणीवरून गतिरोधक बसविण्यात आलेले आहेत. मात्र याच मार्गावर लिंबागणेश येथील बसस्थानक आणि भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासमोर सुरक्षिततेसाठी गतिरोधक बसविण्यास एचसीपीएल कंपनीला काय अडचण आहे असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व हरिओम क्षीरसागर यांनी विचारला आहे.

अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावरील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात

### लिंबागणेशकर पुन्हा आंदोलनाच्या पावित्र्यात

जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करणा–या एचपीसीएल कंपनीकडून जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करण्यात येत असुन तातडीने लिंबागणेश येथील बसस्थानक, भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आदी अपघात प्रवण क्षेत्रात गतिरोधक न बसवल्यास पुन्हा आंदोलनाचा ईशारा ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांना दिला आहे.

१००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असुन शाळेचे मुख्य प्रवेशद्वार अगदी महामार्गाला लागुनच असल्याने शाळा भरताना आणि शाळा सुटल्यानंतर गर्दी असते.याठिकाणी यापूर्वी सुद्धा वारंवार अपघाताच्या घटना घडलेल्या असुन या अपघात प्रवण क्षेत्रात गतिरोधक बसविण्याची मागणी गेल्या २ वर्षांपासून पालकांची असुन डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली २-३ वेळा रास्तारोको आंदोलन करण्यात आलेले आहेत.

गेल्यावर्षी दि.४ जानेवारी २०२४ रोजी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासमोर गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ३ तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. तत्कालीन तहसीलदार सुहास हजारे यांनी याची दखल घेत दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजी तहसिल कार्यालयात बैठक बोलावली होती.तेव्हा म.रा.म.वि.(मर्या) छत्रपती संभाजीनगर अभियंता महेश देशमुख,नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर, एचसीपीएल कंपनीचे कंत्राटदार यांनी राष्ट्रीय महामार्गावरील गतिरोधक बाबत सडक परीवहन व राजमार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांच्या दि.२९ आगस्ट २०१६ रोजीच्या पत्रकान्वये महामार्गावरील गतिरोधक बाबत सुचना प्राप्त अनुषंगाने गतिरोधक बसविण्यात येणार नाही असे सांगून प्रशासनाची दिशाभूल केली.मात्र बसस्थानक, शाळा, धोकादायक वळण आदी अपघात प्रवण क्षेत्रात ग्रामस्थांनी मागणी केल्यानंतर बसविण्यात येते. त्याच अनुषंगाने एचपीएम कंपनीने येळंबघाट याठिकाणी गतिरोधक बसविले असुन रात्रीच्या वेळी लांबुन गतिरोधक दिसावेत यासाठी रेडीमेड बसविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे लिंबागणेश याठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी डॉ.गणेश ढवळे व हरिओम क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

---

## थोडक्यात



### बीड जिल्हा वकील क्रिकेट संघाच्या टी-शर्टचे अनावरण

बीड: संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय वकिलांच्या क्रिकेट स्पर्धेसाठी बीड जिल्हा क्रिकेट वकील संघास शुभेच्छा व प्रयोजक कलीम जहांगीर तर्फे क्रिकेट टी-शर्टच अनावरण करताना, बीड जिल्हाचे प्रमूख व सत्र न्यायाधीश मा.आनंद यावलकर साहेब, बीड जिल्हा वकील संघांचे अध्यक्ष ॲड. रोहिदास येवले, सचिव ॲड. यासेर पटेल, क्रिकेट कोच ॲड. राजन साळवी, उपाध्यक्ष ॲड. नितीन वाघमारे, उपाध्यक्ष ॲड. अविनाश गडगे, सहसचिव ॲड. श्रीकांत जाधव, ॲड. प्रशांत देशपांडे, महिला प्रतिनिधी ॲड. छाया वाघमारे, कोच आझर सर, कोच संजय धस, ॲड. प्रशांत जाधव, बीड जिल्हा वकील क्रिकेट संघांचे कर्णधार ॲड. साजेद सय्यद, उपकर्णधार ॲड. राहुल वाडमारे, ॲड. रंजीत वाघमारे, ॲड. सुशीम वाडमारे, ॲड. फिरोज पठाण, ॲड. सचिन काळकुटे, ॲड. शैलेश जाधव, ॲड. सिद्धार्थ उजगरे, ॲड. बाळासाहेब मगर, ॲड. आगे, ॲड. पोपळे, तसेच बीड जिल्हा वकील संघ क्रिकेट टीमचे सदस्य तसेच वकील महिला क्रिकेट संघाचे सदस्य उपस्थित होते

### स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने हिवाळी बालसंस्कार शिबिर

पाटोदा: येथे श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या वतीने रविवारी. बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ दिंडोरी नाशिक यांच्या वतीने पाटोदा श्री स्वामी समर्थ केंद्रात मूल्य संस्कार. बालसंस्कार व युवा प्रबोधन व योगा घेण्यात आले. आजच्या युवा पडला संस्काराची गरज असून युवा पिढीचे पुढील भविष्य लक्षात घेता बालवयातील संस्कार दिले तरच युवा पिढी घडेल व राष्ट्र संस्कृती टिकेल असे गुरुमाऊलीचे म्हटले आहे तालुकास्तरीय मूल्य संस्कार व्यक्तिमत्व विकास हिवाळी शिबिर पाटोदा श्री स्वामी समर्थ केंद्रात पार पडले. या शिबिरामध्ये. मुलांना ज्ञानदानातून प्रत्यक्ष प्रशिक्षण. विद्यार्थ्यांसाठी आदर्श दिनचर्या मार्गदर्शन भारतीय कायदा सोप्या भाषेत समजून सांगणे रांगोळी स्पर्धा. चित्रकला स्पर्धा खेळ. मातीचे किल्ले बनवणे. इत्यादी हे शिबिरामध्ये घेण्यात आले.या शिबिरामध्ये प्रमुख उपस्थिती सतीश चोले,विजय अंदोरी, सतीश गरजे,फुंदे इत्यादी उपस्थित होते

---

# स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सर्व पक्ष, समाज आणि संघटना एकत्र येणार


## आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आज सामूहिक बैठक

बीड। प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अमानवीय पध्दतीने निघृण हत्या केल्याच्या प्रकरणात न्याय मिळविण्यासाठी सर्व पक्ष, समाज व संघटना आणि एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी सोमवारी (दि.२३) रोजी बीड शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे सकाळी १० वा. सामूहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. अतिशय निघृणपणे स्व.देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल १४ दिवस उलटूनही स्व.देशमुख यांचे मारेकरी आणि या प्रकरणाचा सुत्रधार अद्याप मोकाट आहेत. इतके गंभीर प्रकरण असताना प्रशासनाकडून आरोपींच्या अटकेत चालढकल केली जाते आहे. आरोपी हे सत्तेच्या राजाश्रयात असल्याने त्यांना अटक केली जात नाही. सत्तेचा इतका दुरूपयोग जनसामान्यांना घातक ठरत चालला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आणि सर्व विचारांचे लोक एकत्र येऊन सर्वसमावेशक आंदोलन उभे करणार आहेत. दरम्यान या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित केलेल्या सामूहिक बैठकीला सर्व पक्ष, संघटना आणि सर्वच विचारांच्या लोकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री स्वामी समर्थ केंद्र पाटोदाच्या वतीने हिवाळी बालसंस्कार शिबिर संपन्न



पाटोदा। प्रतिनिधी

येथे श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या वतीने रविवारी. बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ दिंडोरी नाशिक यांच्या वतीने पाटोदा श्री स्वामी समर्थ केंद्रात मूल्य संस्कार. बालसंस्कार व युवा प्रबोधन व योगा घेण्यात आले. आजच्या युवा पडला संस्काराची गरज असून युवा पिढीचे पुढील भविष्य लक्षात घेता बालवयातील संस्कार दिले तरच युवा पिढी घडेल व राष्ट्र संस्कृती टिकेल असे गुरुमाऊलीचे म्हटले आहे तालुकास्तरीय मूल्य संस्कार व्यक्तिमत्व विकास हिवाळी शिबिर पाटोदा श्री स्वामी समर्थ केंद्रात पार पडले. या शिबिरामध्ये. मुलांना ज्ञानदानातून प्रत्यक्ष प्रशिक्षण. विद्यार्थ्यांसाठी आदर्श दिनचर्या मार्गदर्शन. भारतीय कायदा सोप्या भाषेत समजून सांगणे रांगोळी स्पर्धा. चित्रकला स्पर्धा खेळ. मातीचे किल्ले बनवणे. इत्यादी हे शिबिरामध्ये घेण्यात आले.

या शिबिरामध्ये प्रमुख उपस्थिती. श्री सतीश चोले. विजय अंदोरी . सतीश गरजे. फुंदे ताई. इत्यादी उपस्थित होते.

---

# संतोष देशमुख हत्या प्रकरणी चिंचाळा येथे कॅण्डल मार्च



आष्टी। प्रतिनिधी

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना अटक झालीच पाहिजे संबंधित प्रकरणातील आरोपी व पाठीराखे,आणि सूत्रधार (आका) यांना देखील अटक झालीच पाहिजे अशा घोषणा देत हातात फलक घेत य चिंचाळा येथे शनिवार सायंकाळी परिसरातील नागरिकांच्या वतीने कँडल मार्च काढत सरपंच हत्येच्या घटनेचा निषेध केला.बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील युवा सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील काही आरोपींना अजूनही अटक झाली नाही उर्वरित सर्व आरोपींना अटक झालीच पाहिजे तसेच यामागील पाठीराखा व मुख्य सूत्रधार यांना सुद्धा अटक झाली पाहिजे त्यांना फाशीचीच शिक्षा व्हावी अशा घोषणा देत गावामध्ये कॅण्डल मा मार्च काढण्यात आला यावेळी लहान मुलांसह गावातील युवक वर्ग,ज्येष्ठ नागरिक,,पदाधिकारी मोठ्या संख्येने या कँडल मार्च मध्ये सहभागी झाले होते.

# तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे श्रीमद्भागवत कथा व तुळशी पूजा नाम यज्ञ सोहळा

बीड । प्रतिनिधी

मकर संक्रांति महापर्वणी पर्वकाळ निमित्ताने तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे श्रीमद्? भागवत कथा व तुळशी पूजा नाम सप्ताह चे आयोजन करण्यात आलेले आहे. ह भ प ज्योतिषाचार्य बबन देवा महाराज जोशी शिरस मार्गकर यांच्या अमृतमय वाणीतून दररोज रात्री ७ ते ९.३० या वेळेत श्रीमद्? भागवत कथा व तुळशी पूजा नाम जप यज्ञ नारायणगड मठ पंढरपूर येथे या नाम सप्ताहाचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आलेले आहे. या नाम सप्ताहामध्ये सकाळी ४ ते ६ काकडा भजन, ११ ते २ तुळशी अर्चना पूजा २ ते ५संगीत भजन ६ वाजता हरिपाठ व सायंकाळी ७ ते ९ या वेळेमध्ये श्रीमद भागवत कथा संपन्न होणार आहे. भागवत कथेचा शुभारंभ दिनांक ८ /१/ २०२५ बुधवारी दुपारी पंढरपुर नगर प्रदक्षिणा करून भव्य दिव्य स्वरूपातभागवत कथा आरंभ होणार आहे .

पावित्र तीर्थ पंढरपुरी येथे भागवत कथा श्रवण करण्यचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा. या नाम सप्ताह कार्यक्रमाची सांगता बुधवार दिनांक १५ १ २०२५ सकाळी ९ ते १ या वेळेत नारायणगड मठाचे महंत ह भ प प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांच्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने होऊन महाप्रसाद होणार आहे. या पावन पर्व काळामध्ये माता, भगिनी व महिला भक्तांनी जास्तीत जास्त सहभागी होऊन या तुळशी नाम यज्ञात सहभागी व्हावे तसेच श्रीमद्? भागवत कथेचा श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन या सप्ताहाचे नेतृत्व करणारे ह भ प धुराजी महाराज कोळेकर व ह भ प कृष्णा महाराज जोशी काका शिरसमार्ग यांनी केले आहे.या पंढरपूर येथे होणाऱ्या भागवत कथा व तुळशी पूजा नाम सप्ताह मधे सहभागी होण्यासाठी भाविक भक्तांनी ९८२२०३८७५७या मोबाईल वर संपर्क साधावा असे महाराज कळवतात

---

# मुख्यमंत्री फडणवीस, ना.पंकजा मुंडे, ना. धनंजय मुंडे यांचा सत्कार करणार : माजी.आ.धोंडे

आष्टी। प्रतिनिधी

राज्यात महायुतीचे सरकार सत्तारुढ झाले आहे. बीड जिल्ह्यातून कॅबिनेट मंत्रीपदी ना. पंकजाताई मुंडे व ना.धनंजय मुंडे यांना संधी मिळाली आहे.त्यांचा कोणी सत्कार केला नसला तरी आपण आष्टीत लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तारीख घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,ना.पंकजाताई मुंडे,ना. धनंजय मुंडे यांचा लवकरच भव्य सत्कार करु,कार्यकर्त्यांनी पराभवाने खचून जावू नये निवडणुकीत जय पराजय होतच असतो. मी राजकारण सोडणार नाही.लोकांसाठी राजकारण करीतच राहणार आहे.पराभवाने खचून जावू नका; संघर्ष करीत करीत राजकारण करतच राहणार असे माजी आ.भीमराव धोंडे यांनी आष्टी येथे आयोजित कार्यकर्ता चिंतन बैठकीत बोलताना केले.माजी आ.भीमराव धोंडे यांनी लोकाग्रहास्तव अपक्ष निवडणूक लढवली परंतु पराभवास सामोरे जावे लागले.आष्टी कार्यकर्ता चिंतन बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी आ.भीमराव धोंडे हे होते.याप्रसंगी व्यासपीठावर युवा नेते अजयदादा धोंडे,जेष्ठ नेते लालाभाऊ कुमकर, माजी जि.प.सदस्य





रामराव खेडकर,रामदास बडे,दशरथदादा वनवे,ॲड.रत्नदिप निकाळजे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे,उपसभापती पांडुरंग नागरगोजे, माजी सभापती सुवर्णा लांबरूड, जि.प.सदस्य सुरेश माळी, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, अशोक दहिफळे, सरपंच दादासाहेब जगताप, माऊली पानसंबळ, हरिभाऊ जंजिरे, माजी सभापती नियामत बेग, माजी सरपंच बबनराव औटे,पोपटराव सिरसाट, ॲड.मोहन खेडकर, ॲड. संभाजी दहातोंडे, देवीदास शेंडगे, महारूद्र खेडकर, राजपल शेंडगे, विठ्ठलराव बन्सोडे, हरिभाऊ जंजीरे, यासीनभाई शेख, माऊली पानसंबळ, अस्लम बेग, अस्ताक शेख, छगन तरटे, दिलीप काळे, अंकुश मुंढे, दादा जगताप, बाबु कदम, दादा विधाते, बाळासाहेब शिंदे, आदिनाथ गवळी, संजय मिसाळ, विष्णू दहिफळे,बाबा गर्जे,कृष्णा गोल्हार,गौतम सावंत,शेख अन्सारभाई,युवराज खटके,रघुनाथ शिंदे,बबन सांगळे,सदा पाटील दिंडे,राजेंद्र खाडे,एकनाथ सानप, अभय गर्जे,श्रीराम गर्जे आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मस्साजोग येथील सरपंच कै.संतोष देशमुख व परभणी येथील कै.सोमनाथ सुर्यवंशी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की,विधानसभा निवडणुकीत सर्वांनीच खुप कष्ट घेतले परंतु आपल्या कष्टाचे चीज झाले नाही. मला ना.पंकजाताईं मुंडे व इतर काही मित्रांनी सांगितले होते की, अपक्ष लढणे अवघड आहे.पण लोकांच्या आग्रहामुळे रिंगणात उतरलो.पण आजच्या काळात अपक्ष लढविणे सोपे नाही. शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली मोफत विज पुरवठा योजना,लाडकी बहीण योजना यामुळे मतदान फिरले असावे तसेच ईव्हिएम मशिनचाही संशय आहे. राज्यातील १०० मतदार संघात पराभुत उमेदवारांनी ईव्हीएम विरोधात तक्रार केली आहे. निवडणूक प्रक्रीयेत सुधारणा होणे आवश्यक आहे. भविष्यात ते होईल.पुढच्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी हा मतदारसंघ महिलांसाठी राखीव महिला होऊ शकतो. शेतकरी जसा शेवट पर्यंत शेती करतो तसे आपण देखील शेवटपर्यंत राजकारण करू. तसेच सरकारच्या माध्यमातून लोकांचे वैयक्तिक व सार्वजनिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करु.ना. पंकजाताईं मुंडे यांच्या दोन सभा झाल्या नसत्या तर माझा विजय झाला असता.आपण आरक्षण मुद्यावर वादग्रस्त ठरलो नाही. सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम केले तसे संस्कार माझ्यावर आहेत.नागपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन दौलावडगाव ते लिंबादेवी हा रस्ता कॉंक्रिट करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.तसे पत्र त्यांना दिले आहे. कार्यक्रमास विकी शेकडे,विठ्ठलराव बनसोडे,युवा नेते अभयराजे धोंडे, राजपाल शेंडगे,लाभेश गाडेकर, दिलीपराव काळे,रावसाहेब लोखंडे, रघुनाथ शिंदे,बाबुराव कदम, पांडुरंग गावडे,चेअरमन राजेश धोंडे,आस्ताक शेख,ह.भ.प. पांडुरंग कर्डिले,हादी शेख,विष्णू कराळे,अंकुश मुंढे,माजी जि.प. सदस्य सतिशमामा झगडे,शेख अन्सारभाई,राजेंद्र खाडे,मतीन भाई शेख,संजय कांकरिया,सरपंच ज्ञानदेव केदार,युवराज खटके, चंद्रशेखर साके,माजी पं.स.सदस्य संजय धायगुडे,सरपंच संजय विधाते,चेअरमन बाळासाहेब शिंदे,गौतम ससाणे,गौतम सावंत,दादा विधाते, हरिचंद्र बोडखे, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी शेख,विठ्ठलराव लांडगे, गणेश सिरसाठ, सरपंच माऊली वाघ,कृष्णा गोल्हार,आजिनाथ गवळी,कुंडलिक आस्वर, आण्णासाहेब लांबडे,अभय गर्जे, इंजि.एन.एम.बडे,सरपंच भरत जाधव,शहादेव खेडकर,लिंबराज कर्डीले, सुधीर ढोबळे,अमर माळी,वैभव बडे,विकास वनवे, रामदास गिते,चेअरमन शाम सांगळे,माजी सभापती अनिल जायभाय, दादासाहेब विधाते,नईम शेख,परमेश्वर खेडकर,सरपंच विष्णू दहिफळे,संजय मिसाळ'अस्लम बेग यांच्यासह आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी गौतम ससाणे, दादासाहेब विधाते,दिलीप काळे, अशोक बेद्रे,सरपंच संजय विधाते, याशिनभाई शेख,बबन सांगळे, कृष्णा गोल्हार,अशोक साळवे, नियामत बेग,रामदास बडे,रावराव खेडकर ,राजपाल शेंडगे यांची भाषणे झाली. सुत्रसंचलन निलेश दिवटे, प्राचार्य बाळासाहेब खेमकर तर आभार सईद चाऊस यांनी मानले.

# निराधारांना मिळणार संजय गांधी, श्रावणबाळ योजनेचा लाभ

## आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला यश

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील अनेक निराधारांना संजय गांधी, श्रावणबाळ योजनेच्या माध्यमातून आधार मिळणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांच्या रखडलेल्या मंजुरी अखेर झाल्या असून नवीन लाभार्थ्यांची यादी तयार झाली. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा केला होता. त्याला आता यश आले आहे.

निराधार वयोवृद्ध नागरिक यांना निर्वाहासाठी निधी देणारी श्रावणबाळ योजना तसेच निराधार व्यक्ती, अंध, अपंग, अनाथ मुले, दिर्घ आजार, घटस्फोटीत स्त्रिया इत्यादी दुर्बल घटकांना आर्थिक मदत पुरवणारी संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि अशाप्रकारच्या इतर योजनांच्या समितीची गेल्या अनेक दिवसांपासून बैठक झाली नव्हती, त्यामुळे गोरगरीब आणि गरजू या योजनांच्या लाभापासून वंचित होते. बर्याच दिवसांपासून प्रस्ताव आणि अर्ज दाखल करून देखील लोकांना लाभासाठी प्रतिक्षा करावी लागत होती. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा करून, बैठका घेऊन संबंधित यंत्रणा व योजना समितीच्या बैठका घेऊन नवीन पात्र लाभार्थी यादीत समाविष्ट करून पात्र आणि गरजूंना लाभ देण्यासाठी निर्देशीत केले होते. यावर आता श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेंतर्गत बीड तालुक्यातील ग्रामीण भागातून असलेल्या १२९ व शहरातील ९७ नवीन लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. यासोबतच संजय गांधी निराधार पेन्शन योजनेंतर्गत शहरातील ७६ व ग्रामीण भागातील ११२ पात्र आणि गरजू लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. तहसिलदार यांच्या नेतृत्वाखाली सदरील योजनांची बैठक होऊन नवीन लाभार्थींचा योजनेच्या यादीत सामावेश केला गेला आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून वंचित असलेल्या गोरगरीब, निराधार, दुर्बल घटकांना आ.संदीप क्षीरसागरांच्या माध्यमातून मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान ज्या लाभार्थ्यांचे अर्ज त्रुटीत पडले आहेत, त्यांनी लवकरात लवकर त्रुटीपूर्तता करावी असे आवाहनही आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



# राशन दुकानदार पैसे मागत असेल तर तहसीलदार किंवा मला संपर्क करा-खुर्शीद आलम

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील स्वस्त धान्य दुकानदार कधी काय करेल सांगता येत नाही, एक तर वेळेवर अन्नधान्य वितरण करत नाहीत दिले तर नियम अनुसार देत नाहीत, कार्ड धारकांना अरेरावीची भाषा करतात, आत्ता तर स्वस्त धान्य दुकानदार कडून केवायसीचे नावावर कार्ड धारकांना शंभर रुपयाची लूट सुरू केली आहे तर दुसरीकडे केवायसी चे नावावर त्यांचे अंगठी घेऊन धान्य काढले जात आहे विशेष म्हणजे डिसेंबर महिन्याचा धान्याचा ट्रांजेक्शन सुद्धा केला जात आहे याची लाभार्थ्यांना कोणतीच कल्पना नसताना ट्रांजेक्शन केला जात आहे विशेष म्हणजे डिसेंबर महिन्यातील ट्रांजेक्शन केलेले आणि त्यांना डिसेंबर महिन्यातील धान्य मिळणार का यावर वरिष्ठ अधिकारी लक्ष देणार का नाही हा प्रश्न निर्माण झाले आहे

बीड स्वस्त धान्य दुकानदारांचे मनमानी कारभार सुरू आहे मनाला वाटेल त्या पद्धतीने नव नवीन नियम लादण्याचा प्रयत्न सुरू केला आहे विशेष म्हणजे गोरगरीब लाभार्थींना कोणतेही जाणिव नसताना त्यांचे दिशाभूल करून केवायसीच्या नावाने धान्य लाटण्याचा गोरख धंदा सुरू केला आहे, विशेष म्हणजे शासनाकडून केवायसी मोफत असतानाही केवायसीच्या नावावर शंभर शंभर रुपयाची मागणी करत आहेत या बाबतीत आम्ही बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके साहेबांशी संपर्क केले असता त्यांनी केवायसीची मोफत आहेत म्हटले आहे म्हणून नागरिकांना विनंती आहे की जर तुमचा राशन दुकानदार केवायसीसाठी पैसे मागत असेल तर माझे मो.९८२२८८७०३९ खुर्शीद आलम वर किंवा ९५९५१८४५४५ चंद्रकांत शेळके साहेब यांच्याशी संपर्क करा असे आवाहन माजी सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड शहर अध्यक्ष खुर्शीद आलम यांनी केले आहे,



# एन एस एल शुगर्स ने डिस्लरीचे विषारी पाणी पाटात सोडल्याने शेकाप आक्रमक

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील धरणाचे पाणी शेतीसाठी सोडण्यात आले असून माजलगाव तालुक्यात उसाच्या पिकाची लागवडीसाठी शेतकरी सज्ज असताना एन एस एल सुगर्स ने ड्स्लिरी चे विषारी पाणी पाटात सोडल्याने गुरांसह मनुष्याच्या जीवीतास धोका निर्माण झाला असून पिकांचेही नुकसान झाले असून एन एस एल शुगरच्या डिसलरी च्या विषारी पाण्याने उसाचे पीक जळण्याच्या भीतीने तीन दिवसापासून शेतकरी ऊस लागवड करायला तयार नाहीत याबाबत शेकापचे नेते भाई अॅड नारायण गोले पाटील यांनी प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन पाहणी करून शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्यानंतर कारखाना प्रशासन, उपविभागीय अभियंता शेतचारी अस्तारीकरण यांना एन एस एल शुगरचे विषारी घाण पाणी थांबवल्या शिवाय शेतकऱ्यांना उसाची लागवड करता येणार नाही ही बाब लक्षात घेऊन उपविभागीय अभियंता शेतचारी अस्तारीकरण उपविभाग क्रमांक दहा यांनी तात्काळ एन एस एल शुगर्स कारखान्यावर गुन्हे दाखल करावेत तसेच एन एस एल सुगर्स कारखान्यास अनेक वेळा विनंती करून देखील माजलगाव धरणाच्या पाठात डिसलरीचे विषारी व घाण पाणी सोडणे चालूच ठेवले असून एन एस एल सुगर्स कारखान्याने माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा विडा उचलला आहे काय.? असा सवाल करत डिसलरी चे विषारी घाण पाणी पाटात सोडणे तात्काळ बंद करावे अन्यथा पशुधना सह मनुष्याच्या जीवित तास धोका निर्माण करणाऱ्या आणि शेतकऱ्यांच्या शेतीच नुकसान करणारा एन एस एल शुगर्स कारखाना बंद करण्याचा इशारा शेकापचे भाई अॅड. नारायण गोले पाटील यांनी निवेदनाद्वारे २२ डिसेंबर रोजी दिला आहे.



# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलचे ६ वे वार्षिक स्नेहसंमेलन

## २४ डिसेंबर रोजी मी होणार सुपरस्टार नृत्य कोरिओग्राफर साक्षी मेथे यांची विशेष उपस्थिती

**परळी । प्रतिनिधी**

विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी संचलित परळी येथील दिल्ली वर्ड पब्लिक स्कूल व पोदार जम्बो किड्स चे ६ वे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन मंगळवार दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६:०० वाजता दिल्ली वर्ड पब्लिक स्कूल च्या प्रणांगणामध्ये होत आहे.

या कार्यक्रमास विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषाताई किरण गित्ते, उपजिल्हाधिकारी मा.अरविंद लाटकर साहेब परळी वैजनाथ यांची उपस्थिती लाभणार आहे. स्टार प्रवाह चॅनल मधील 'मी होणार सुपरस्टार' नृत्य कोरिओग्राफर साक्षी मेथे यांची या कार्यक्रमासाठी 'विशेष आकर्षण' म्हणून उपस्थिती असणार आहे.

या वार्षिक स्नेहसंमेलनाची थीम आहे ' ' म्हणजे विविध प्रकारचे पात्र असलेले मॅजिक बुक. देशाच्या प्रमुख राज्यातील संगीत ,नाट्य आणि संस्कृतीची वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांकडून या स्नेह संमेलनात प्रदर्शित करण्यात येणार आहेत. दिल्ली वर्ड पब्लिक स्कूल व पोदार जम्बो किड्स च्या ६ व्या वार्षिक स्नेहसंमेलना निमित्त ८०० हून अधिक विद्यार्थी- विद्यार्थिनींना आपल्या कला, नृत्य व गायन कौशल्याचे सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे. तरी वार्षिक स्नेह संमेलनासाठी सर्व विद्यार्थी आणि पालकांनी आवर्जून उपस्थित रहावे असे असे आवाहन दिल्ली वर्ड पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक डॉ. श्रीकांत पाटील व पोदार जम्बो किड्स च्या मुख्यध्यापिका स्नेहा गित्ते मॅडम यांनी केले आहे.



# दिव्यांग व्यक्तीला मारहाण करणाऱ्यावर कडक कारवाई करावी-डॉ.संतोष मुंडे

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहरातील येथे शिवभोजन केंद्रात जेवण करण्यासाठी आलेल्या दिव्यांगाला लाथा बुक्क्यांनी मारहाण झाल्याची घटना घडली आहे. शिवभोजन चालका कडून दिव्यांग व्यक्तीला मारहाण सदरील दिव्यांग व्यक्ती बाहेरील असल्याने संपर्क होत नाही. सदरील व्यक्तीचा संपर्क झाल्यास सदरील व्यक्तीला सोबत घेऊन दिव्यांग व्यक्तीला मारहाण करणाऱ्या सदरील शिव भोजन चालकावर कार्यवाही करणार सदरील घटनेचा डॉ संतोष मुंडे दिव्यांग मंत्रालय राज्य उपाध्यक्ष महाराष्ट्र यांनी घटनेचा जाहीर निषेध व्यक्त केला आहे.



याबाबत अधिका माहिती अशी की, बीडच्या परळीतील रेल्वे स्टेशन परिसरात असलेल्या एका शिवभोजन केंद्रावर एक दिव्यांग जेवण करण्यासाठी गेला होता परंतु या शिव भोजन केंद्राचा चालक व त्याच्या सहकाऱ्यांनी जेवण तयार नाही असे म्हणत या दिव्यांगाला बाहेर काढले व लाथा बुक्क्याने मारहाण केली. हा सर्व प्रकार एका व्यक्तीने आपल्या मोबाईल कॅमेरा मध्ये कैद केला असून आता तो वायरल झाल्यानंतर या सर्व प्रकारावर संतापाची लाट उसळी आहे.. अशा पद्धतीने जेवण मागण्यासाठी आलेल्या दिव्यांगाला मारहाणीची घटना घडल्याने सर्वत्र निषेध व्यक्त होत आहे. परळीतील शिवभोजन केंद्रात जेवण करण्यासाठी आलेल्या दिव्यांगाला लाथा बुक्क्यांनी मारहाण करणाऱ्यावर व्यक्तीवर कारवाई करावी तसेच दिव्यांग हक्क अधिकार अधिनियम अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी डॉ संतोष मुंडे दिव्यांग मंत्रालय राज्य उपाध्यक्ष महाराष्ट्र यांनी केली आहे. तात्काळ या घटनेची कारवाई नाही झाली तर राज्याची मुख्यमंत्री यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. घटनेचा डॉ. मुंडे यांनी निषेध व्यक्त केला आहे.

# हिवाळी अधिवेशनात महायुती सरकारने धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी - चंद्रकांत हजारे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा, या प्रमुख मागणीला घेऊन मागील काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उपोषण, विविध आंदोलने झाली. समाज बांधवांनी संविधानामध्ये अनुसूचित जमातीच्या सूचित धनगर जमात समाविष्ट असल्याचे सांगून अंमलबजावणी केली जात नसल्याचा आरोप केला होता. यावर धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ देण्यासाठी शिंदे सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यामुळे आता पुन्हा सत्तेवर आलेल्या महायुती सरकारने दिलेला शब्द पाळून नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करीत आरक्षणाचा तिढा संपवावा. अशी मागणी धनगर आंदोलक चंद्रकांत हजारे यांनी केली आहे. आश्वासनाची पुर्तता केली नाही. तर पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा ही हजारे यांनी दिला आहे.

धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यावर राज्यात अनेक ठिकाणी आंदोलने, उपोषणे करण्यात आली. यात धनगड जमातीच्या एका कुटुंबातील सहा जणांचे धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी केली होती. यावर राज्य सरकारने ही मागणी पूर्ण करून धनगड जमातीचे प्रमाणपत्र ही रद्द केले आहे. याबाबत अधिक माहिती देताना धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे यांनी सांगितले की, धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा, या प्रामुख मागणीला घेऊन मागील चार महिन्यांपूर्वी लातूर येथे उपोषण, विविध आंदोलने झाली. समाज बांधवांनी संविधानामध्ये अनुसूचित जमातीच्या सूचित धनगर जमात समाविष्ट असल्याचे सांगून अंमलबजावणी केली जात नसल्याचा आरोप केला होता. यावर धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या ◀◀ पान ३ वर



### अन्यथा धनगर समाज पुन्हा आंदोलन करणार

राज्यात धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मागणी ही गेली काही महिन्यांपासून जोर धरून होती. त्यामुळे राज्यातील महायुतीच्या सरकारने मागणी संदर्भात सकारात्मक असल्याचे सांगितले. याप्रश्नी दोन वेळा मंत्रालयात बैठका ही झाल्या. त्यात आचारसंहिता लागली. त्यामुळे आरक्षणाचा मुद्दा पुढे ढकलण्यात आला. त्यामुळे धनगर समाजाने आरक्षण मिळावे यासाठी राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणले आहे. त्यामुळे हिवाळी अधिवेशनात सरकारने समाजाला दिलेला शब्द पाळावा, अन्यथा पुन्हा एकदा धनगर समाज रस्त्यावर येऊन आंदोलन करण्यासाठी तयार आहे याची नोंद महायुती सरकारने घ्यावी.

- चंद्रकांत हजारे (धनगर समाजाचे नेते)

# ज्ञानदीप विद्यालयातील पालक मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद





किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर येथील ज्ञानदीप विद्यालय व बालसस्कार केद्रातील पालकाचा पालक मेळावा व विवीध स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्याचा गुणगौरव विवीध स्पर्धा चे बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. या शाळेतील विवीध उपक्रम विशेषताह बाल वया पासुन स्पर्धा परीक्षाचे दिले जाणारे मार्गदर्शन यांचे पालकानी विशेष कौतूक केले व काही सुचना पालकानी माडल्या. या पालक मेळाव्यास उस्फुर्त प्रतीसाद मिळाला.

किल्ले धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्र किल्ले धारुर या ठिकाणी पालक मेळाव्याचे आयोजन आज करण्यात आले होते. या पालक मेळाव्यास मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात क्रातीज्योती सावित्रीबाई फुले व सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून करण्यात आली. त्यानंतर विद्यालयातील विविध शालेय स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व विद्यालयात विद्यार्थी व पालकांसाठी राबवण्यात आलेल्या विविध उपक्रम व स्पर्धेतील बक्षिस वितरण करून गौरव करण्यात आला त्यानंतर विद्यालयातील पालकांनी आपले विद्यालयाविषयी मनोगत व्यक्त केले तर उपस्थित मान्यवरांनी पालक व शिक्षक यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयातील पालक अशोक राठोड तर प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत देशपांडे , सय्यद शाकेर, दिनेश कापसे, नवनाथ नखाते, तानाजी शिंपले, शैला महाजन, उज्वला शिनगारे, ढाने मॅडम हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षक अशोक अंडील , प्रस्ताविक शिक्षक सचिन चव्हाण तर आभार शिक्षीका वर्षा साळवे यांनी मानले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले मातापालक व पालक मोठया संख्येने या पालक मेळाव्यास उपस्थीत होते.

# २ रे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी दगडू लोमटे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी येथील प्रसिद्ध साहित्यिक दगडू लोमटे यांची निवड करण्यात आली आहे. अंबाजोगाई येथे हे दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलन दि.१ व २ फेब्रुवारी रोजी योगेश्वरी महाविद्यालयाच्या नागापुरकर सभागृहात होणार आहे. महाराष्ट्र भरातून तीनशे गझलकार या गझल संमेलनासाठी उपस्थित राहणार आहेत.

अंबाजोगाई येथील साधना सेवाभावी संस्था यांच्या वतीने अंबाजोगाईत दि. १ व २ फेब्रुवारी रोजी दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलन होणार आहे. या निमित्ताने झालेल्या बैठकीत स्वागत समितीची निवड करण्यात आली. यात स्वागताध्यक्ष म्हणून दगडू लोमटे, कार्याध्यक्ष डॉ.शुभदा लोहिया (राठी), उपाध्यक्ष निशा चौसाळकर, प्रा.मुकुंद राजपंखे, प्रा.शैलजा बरूरे, विद्याधर पांडे, शशिकला घोडके, सचिव गोरख शेंद्रे, सहसचिव दिवाकर जोशी, डॉ.राहुल धाकडे, कोषाध्यक्ष सुनिल जाधव तर स्वागत समिती सदस्य म्हणून कमलाकरराव चौसाळकर, अॅड.अनंतराव जगतकर, अनिकेत लोहिया, डॉ.नरेंद्र काळे, राजपाल लोमटे, बिपिन क्षीरसागर, महेश लोमटे, कल्याण काळे, डॉ.नवनाथ घुगे, लक्ष्मण टाक, एस.बी.सय्यद, संजय सुराणा, अॅड.जयंत भारजकर, अविनाश मुडेगावकर, खाजाभाई यांची स्वागत समितीवर निवड करण्यात आली आहे.



यापुर्वीचे पहिले गझल संमेलन अमळनेर येथे सन २०२३ साली झाले होते. या संमेलनात दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलन अंबाजोगाईत घेण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या घोषणेनूसार साधना सेवाभावी संस्थेने या गझल संमेलनाचे पालकत्व स्विकारले. व अंबाजोगाईकरांच्या वतीने हे गझल ◀◀ पान ३ वर

# राजेंद्र घोडके यांना मातृशोक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सार्वजानीक बांधकाम विभाग लातुर येथे वरिष्ठ अरेखक म्हणुन कार्यरत तसेच सामाजीक क्षेत्रात नेहमी अग्रेसर असणारे समाजभुषण राजेन्द्र राधाकिशन घोडके यांच्या मातोश्री मथुराबाई राधाकिसन घोडके, रा.माजलगाव सध्या संत रविदास नगर, चनई रोड, अंबाजोगाई यांचे वृद्धापकाळाने व अल्पशा आजाराने शनिवारी सायंकाळी ६.०० वाजता दुःखद निधन झाले.मृत्यु समयी त्या ८७ वर्षाच्या होत्या. अंतिम संस्कार रविवारी सकाळी ११.०० वाजता बोरूळ तलाव, रविवार पेठ अंबाजोगाई येथे करण्यात आले त्यांना तीन मुले तीन मुली सुना नातवडे असा मोठा परिवार आहे या सर्व स्तरातील मान्यवर उपस्थित होते.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामतीत ३०० कोटींचे आयुर्वेद महाविद्यालय उभारणी अंतिम टप्प्यात ; पवार यांनी केली पाहणी

माळेगाव । प्रतिनिधी

बारामती बदलतेय...स्वार्थाने स्मार्ट शहर म्हणून बारामतीकडे पाहिले जाते. विशेषतः याच वैभरात भर घालण्यासाठी सज्ज झालेली मेडद येथील शासकिय आयुर्वेद महाविद्यालयाची नविन इमारत पाहणी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.



शासनस्तरावर सुमारे ३२५ कोटी रुपये खर्च करून उभारण्यात येत असलेल्या या इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले आहे. पवार यांच्या या भेटीत इमारत रंगरंगोटी बाबत, तसेच उर्वरित फर्निचर उभारणीचे निर्णय अधिकाऱ्यांशी चर्चा करून घेतले गेले. मेडद (ता.बारामती) येथे २० जुलै २०२१ मध्ये शंभर विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्याल व संलग्न १०० रुग्णखटांचे आयुर्वेद रुग्णालय स्थापन करण्यात आले आहे. याकामी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शासनस्तरावर दिलेले योगदान सध्याला प्रत्यक्षात उतरत आहे. हे महत्वाकांक्षी महाविद्यालयाचे कार्यक्षेत्र सुमारे ३० एकर आहे. त्यामध्ये मुख्य इमारत व इतर सेवासुविधा उभारण्यासाठी शासनस्तरावर सुमारे ३२८ कोटी रुपये खर्च होत असल्याचे सांगण्यात आले. अर्थात हे बांधकाम अंतिम टप्प्यात आले आहे. त्या पार्श्वभूमिवर अजित पवार यांनी रविवारी महाविद्यालय इमारत पाहणीसाठी दिलेला वेळ महत्वाचा ठरला.

या भेटीमध्ये पवार यांनी इमारतीचे रंगकाम, फर्निचर उभारणी आणि मेडदमध्ये नव्याने उभारण्यात येणाऱ्या स्मशानभूमीची जागा निश्चिती केली, अशी माहिती महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांनी दिली. यावेळी प्रांताधिकारी वैभव नावडकर, तहसीलदार गणेश शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठाधिकारी अतुल चव्हाण, कार्यकारी अभियंता अमोल पवार, सरपंच गणेश काशीद, अर्जुन यादव, अजित कांबळे आदी पादधिकारी उपस्थित होते.

**आरोग्याविषयी सुविधा देणारा दीपस्तंभ...**

प्रख्यात आयुर्वेदिक शास्त्राचे शिक्षण देणारे शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय बारामतीमध्ये विकसित होत आहे. तालुकास्तरावरील हा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. येथे प्राचीन भारतीय वैद्यकीय पद्धतीचे शिक्षण दिले जाईल आणि सोबतच सामान्य जनतेला प्रभावी आरोग्य सेवासुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. भविष्यात हा प्रकल्प उत्कृष्ट आरोग्यसेवा प्रदान करणारा आणि प्रभावी आरोग्यविषयक सुविधा देणारा दीपस्तंभ बनेल, असा विश्वास बारामतीचे अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांनी व्यक्त केला.

# लोहगावमध्ये टोळक्याची दहशत; दहा वाहनांची तोडफोड

पुणे । प्रतिनिधी

पूर्व वैमनस्यातून लोहगाव भागात टोळक्याने दहशत माजविली. वैमनस्यातून तिघांवर कोयत्याने वार करून त्यांचा खुनाचा प्रयत्न केला. तसेच आठ दुचाकी, एक मोटार, रिक्षाची तोडफोड केली. याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली.

टोळक्याने केलेल्या हल्ल्यात संदीप नंदकुमार आढाव (वय ३५, रा. जाधवनगर, विश्रांतवाडी), सलीम बागवान आणि त्यांचा मुलगा अदियान जखमी झला. याबाबत आढाव यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी निकेश पाटील (वय २१) याला अटक करण्यात आली. त्याच्याबरोबर असलेले साथीदार अक्षय सगळगिळे (वय २०) आणि एका अल्पवयीना विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी रात्री आढाव त्यांच्या दुकानासमोर मित्र बागवान याच्यासोबत गप्पा मारत थांबले होते. बागवान यांचा मुलगा तेथे थांबला होता. आरोपींनी आढाव यांच्यावर कोयत्याने वार केला. त्यांच्या दुकानाचा फलक तोडला. तसेच शेजारी असलेल्या सराफी पेढीच्या फलक तोडला. भांडणात मध्यस्थी करणारे बागवान यांना कोयत्याच्या दांडक्याने मारहाण केली. आढाव यांच्या दुकानासमोर लावलेल्या पाच दुचाकींची तोडफोड केली. धानोरी जकात नाका परिसरात एक मोटार, रिक्षा आणि तीन दुचाकींची तोडफोड केली. कलवड वस्ती परिसरातील एका औषध विक्री दुकानाची तोडफोड केली. या भागातील एस. बी. चायनीज सेंटरमधील साहित्याची तोडफोड केली. बागवान यांचा मुलगा अदियानला दगड फेकून मारला.



या घटनेची माहिती मिळताच रात्रपाळीत गस्त घालणारे परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल, सहायक आयुक्त रंगराव उंडे, प्रांजली सोनवणे यांनी घटनास्थळी भेट दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय संकेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने पसार झालेला आरोपी निकेश पाटील याला अटक करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक धामणे तपास करत आहेत.

# सॅलिसबरी पार्क सदनिकेतून ५० तोळ्यांचे दागिने चोरीला

पुणे : सदनिकेचे कुलूप चावीने उघडून चोरट्यांनी कपाटातील ५० तोळ्यांचे दागिने, हिरेजडीत दागिने तसेच चांदीची लगड, असा ऐवज चोरून नेल्याची घटना सॅलिबबरी पार्कमधील एका सोसायटीत घडली. याबाबत ५७ वर्षीय महिलेने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी यांचे पती लष्कर भागातील एका खासगी कंपनीत लेखापाल आहेत. त्यांचा मुलगा कर सल्लागार असून, मुलगी शिकवणी चालवते. विवाहात त्यांना माहेरकडून २२ तोळ्यांचे सोन्याचे दागिने देण्यात आले होते. सासरकडून आठ तोळे दागिने देण्यात आले होते. फिर्यादी आणि त्यांची मुलगी पूजेसाठी घराजवळ असलेल्या जैन मंदिरात सकाळी ११ वाजता नियमित जातात. १८ डिसेंबर रोजी फिर्यादी यांचे पती सकाळी नेहमीप्रमाणे नोकरीला गेले. कुटुंबातील चौघा सदस्यांकडे सदनिकेची चावी आहे. पती दुपारी घरी जेवणासाठी येतात. पतीकडे असलेली चावी घरात विसरल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादी यांनी त्यांच्याकडील चावी सदनिकेच्या बाहेर असलेल्या पादत्राणे ठेवण्याच्या जाळीत (शू रॅक) लपवून ठेवली. फिर्यादी आणि त्यांची मुलगी दुपारी कामानिमित्त मुकुंदनगर भागात गेल्या. त्यांनी पतीच्या मोबाईलवर संपर्क साधून चावी पादत्राणांच्या जाळीत ठेवल्याची माहिती दिली. दुपारी तीनच्या सुमारास फिर्यादी आणि त्यांची मुलगी काम उरकून घरी आले. पादत्राणांच्या जाळीत ठेवलेली चावी त्यांनी घेतली. सदनिकेचा दरवाजा उघडला तेव्हा बेडरूमधील कपाट उघडून चोरट्याने सोन्याचे दागिने, चांदीची लगड चोरून नेल्याचे उघड झाले. त्यानंतर त्यांनी या घटनेची माहिती पतीला दिली. पोलिसांना या घटनेची माहिती मिळाल्यानंतर स्वारगेट पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक युवराज नांद्रे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक रवींद्र कस्पटे तपास करत आहेत. दरम्यान, भरदिवसा सदनिकेतून ५० तोळ्यांचे दागिने चोरीला गेल्याने परिसरात घबराट उडाली आहे. घरफोडी करणार्या चोरट्यांना पकडण्याची मागणी रहिवाशांनी केली आहे. यापूर्वी सॅलिसबरी पार्क भागत घरफोडीच्या घटना घडल्या आहेत.

# दाट धुक्यामुळे पुणे विमानतळावरील विमानसेवा कोलमडली, तब्बल २२ विमानांच्या उड्डाणांना फटका

पुणे । प्रतिनिधी

सध्या थंडीचा तडाखा संपूर्ण महाराष्ट्रभर पाहायला मिळत आहे पुणे जिल्हा ही याला काही वेगळा नाही. पुण्यातही गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर थंडी पाहायला मिळत आहे. अशातच शनिवारी धुक्याची चादर पसरली होती याचा रस्ते वाहतुकीसोबतच विमानसेवेवरही परिणाम झाला. तब्बल २२ विमानाच्या उड्डाणांना उशीर झाला. त्यामुळे प्रवाशांचे हाल झाले.



पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे शनिवारी पडलेल्या दाट धुक्याचा सकाळी ६ ते दुपारी १२ दरम्यान २२ विमानांना याचा फटका बसला आहे. धुक्यामुळे अर्ध्या तासापासून ते तीन तासांपर्यंत विमानांच्या उड्डाणाला उशीर झाल्याचे दिसून आले. दिल्लीनंतर बेंगळुरू, अहमदाबाद, रांची, हैदराबाद, किशनगड, चेन्नई, बँकॉक या शहरांसाठी जाणाऱ्या विमानांना उशीर झाला. पुण्यात येणारे एक विमान दाट धुक्यामुळे पुणे विमानतळावर उतरु शकले नाही. ते दुसऱ्या शहराकडे वळवावे लागले. त्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले.

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नव्या टर्मिनलवरून विमान उड्डाणांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा विमानांची संख्यादेखेत देखील वाढ आहे. शनिवार, रविवार तर तब्बल २०० पेक्षा जास्त विमान उड्डाणे होत आहेत. शिवाय पुण्यातून देशातील ३५ विमानतळांसह तीन आंतरराष्ट्रीय उड्डाणांना थेट कनेक्टिव्हिटी जोडण्यात आली आहे. मात्र शनिवारी उड्डाणांना उशीर झाल्याने प्रवाशांचे हाल झाले. काही प्रवाशांच्या महत्वाच्या बैठका होत्या. तर, काहींना कार्यालयास पोहचण्यास उशीर झाल्याचे प्रवाशांनी सोशल मीडियावर टाकले. तर, पुण्यातून सकाळी पुणे-बंगळुरू उड्डाण करणार होते. पण, त्याला देखील पाच जास्त उशीर झाला. प्रवाशांनी विमान कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे जाब विचारण्यास सुरूवात केली.

**पुणे विमानतळाला संत तुकारामांचे नाव**

महाराष्ट्र विधानसभेत पुण्यातील लोहगाव विमानतळाचे नाव बदलून जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. पुढील आवश्यक कारवाईसाठी आणि विमानतळाच्या नावात बदल करण्यासाठी हा ठराव आता केंद्राकडे पाठवण्यात येईल.

# मराठा सेवा संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

पिंपरी : मराठा सेवा संघाच्या २०२५ चया दिनदर्शिकेचे प्रकाशन गुरूवारी (दि. १९) विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते संत तुकारामनगर येथील राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन येथे करण्यात आले.या कार्यक्रमास मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय पदाधिकारी प्रकाश जाधव, राज्य पदाधिकारी प्राचार्य रामकिशन पवार, ड लक्ष्मण रानवडे, संभाजी ब्रिगेडचे अभिमन्यू पवार, मनोज गायकवाड, जिजाऊ ब्रिगेडच्या स्मिता म्हसकर, सुनिता शिंदे, सुलभा यादव, अश्विनी पाटील, रेखा गुळवे आदी उपस्थित होते.





मराठा सेवा संघाची दिनदर्शिका पूर्णपणे अंधश्रद्धा मुक्त असून या दिनदर्शिकेत प्रत्येक दिवशी इतिहासात घडलेल्या घटनांची नोंद आहे. ही दिनदर्शिका मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरूषोत्तम खेडेकर यांच्या कार्याला समर्पित केली आहे. २०२५ हे खेडेकर यांचे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. असे प्रकाश जाधव यांनी मनोगतात सांगितले. या कार्यक्रमात मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे यांनी पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारिणीच्या निवडी जाहीर केल्या. डॉ. शिवाजीराव ढगे, शहर सचिव सुनिल जाधव, सहसचिव दिलीप गावडे, सहसचिव संपतराव जगताप, कोषाध्यक्ष वसंतराव पाटील, उपाध्यक्ष प्रकाश बाबर, उपाध्यक्ष मंचक जाधव, उपाध्यक्ष वाल्मिक माने, उपाध्यक्ष विजय शिंदे, संघटक अरूण घोलप, संघटक संदीप नवसुपे, संघटक सत्यशिल जाधव यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. राज्य कार्यकारिणी सदस्य प्राचार्य रामकिशन पवार यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच, मराठा सेवा संघाच्या कार्याची माहीती देऊन पदाधिकाऱ्यांनी सभासद नोंदणी अभियान राबविण्याचे आवाहन केले. याप्रसंगी बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे युवा सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या प्रसंगी ड लक्ष्मण रानवडे, शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे संभाजी ब्रिगेडचे प्रविण कदम, जिजाऊ ब्रिगेडच्या सुलभा यादव यांनी मार्गदर्शन केले.

# बनावट नोटा प्रकरणी गुजरातमधील एका व्यक्तीला पुणे पोलिसांनी घेतले ताब्यात

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरात शंभर आणि पाचशेच्या बनावट नोटा घेऊन आलेल्या एका गुजरातमधील नागरिकास समर्थ पोलिसांनी पकडले आहे. त्याच्या ताब्यातून ७७ हजार रकमेच्या बनावट नोटा हस्तगत करण्यात आल्या. याप्रकरणी समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गौरव रामप्रसाद सविता (रा.जामनगर, गुजरात) असे अटक आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई लखन शेटे यांनी तक्रार दिली आहे. नोटांसह मोबाईल व इतर साहित्य असा एक लाख ५ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार समर्थ पोलिसांनी शुक्रवारी रात्री कोंम्बिंग ऑपरेशन राबवले होते. यावेळी फिर्यादी पोलीस शिपाई शेटे आणि शशिकांत पाटील परिसरातील लॉजेस तपासत होते. तेव्हा त्यांना खबर मिळाली की, एक व्यक्ती बनावट नोटा वापरत आहे. तसेच तो सध्या अपोलो थिएटरजवळ उंटाड्या मारुती मंदिराजवळ थांबला आहे. त्यानूसार पोलीस पथक तेथे गेले. पोलिसांची चाहूल लागताच तो तेथून निघुन जाऊ लागला. मात्र त्याला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्याच्या अंगझडतीमध्ये ५०० रुपये दराच्या १४२ आणि शंभर रुपये दराच्या ६१ अशा ७७ हजार १०० रुपये रकमेच्या बनावट नोटा आढळल्या. याप्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक मेघराज जाधव करत आहेत.

आरोपी गौरव हा हिमाचल प्रदेशात एका हॉटेलमध्ये मॅनेजर म्हणून काम करतो. तो पुणे शहरात फिरायला आल्याचे सांगत आहे. मात्र तो बनावट नोटा मोठ्या शहरांमध्ये वटवून घेण्याच्या उद्देशाने जात असावा अशी शक्यता आहे. या नोटा हुबेहुब असल्यातरी त्याच्यावर वॉटरमार्क छपाईनंतर लावण्यात आला आहे. तसेच नोटांच्यामधील सिल्वर कलरची लाईनही तुटक आहे. त्याच्याकडे संगणकाचा सीपीयु सापडल्याने त्याला छपाईचे तंत्रज्ञान अवगत असावे अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. सध्या तरी तो राजस्थान येथून त्या आणल्याचे सांगत आहे.

# विद्युत वाहक तारांच्या घर्षणाने उसाला आग



नारायणगाव : विद्युत वाहक तारांमध्ये घर्षण होऊन पडलेल्या आगीच्या गोळ्यांमुळे नारायणगाव येथील शेतकरी नवनाथ भुजबळ व विजय भुजबळ यांच्या मालकीच्या तीन एकर क्षेत्र असलेल्या उसाला शुक्रवारी आग लागली असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

विद्युत वाहकतारांमध्ये घर्षण होऊन ऊसाला आग लागली असल्याचे शेतकरी भागेश्वर भुजबळ यांनी बघितले असता त्यांनी तात्काळ नवनाथ भुजबळ व आपला मित्र पोलीस पाटील सुशांत भुजबळ यांना कळविले. एक महिन्याच्या कालावधीत ऊस तुटणार असल्याने पाचटाचे प्रमाण जास्त होते. आगीने रौद्ररूप धारण केले व ऊसाला लागलेली आग सर्व दूर पसरली. महावितरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी डोंगरे यांना घटनेची माहिती समस्त त्यांनी ताबडतोब वीजपुरवठा खंडित केला. उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने आग आटोक्यात येत नव्हती. महावितरण विद्युत पुरवठा खंडित केल्याने आग विझविण्यासाठी पाण्याचे पंप सुरू करण्यास अडथळे निर्माण झाले. उसाच्या क्षेत्रातील पाण्याच्या ड्रिपच्या नळ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाईची मागणी महावितरण कडे केली आहे.

घटनेची माहिती समजताच नारायणगाव पोलीस स्टेशनचे ग्रामसुरक्षा दलाचे जवान पोलीस हवालदार मंगेश लोखंडे, पोलीस कॉन्स्टेबल आनंदा चौगुले, जितेंद्र पाटील, जवान आदित्य डेरे, शंतनू डेरे, युवराज जवळेकर, नवनाथ भुजबळ, भागेश्वर भुजबळ, अनिकेत भुजबळ, सुशील ढवळे, विजय भुजबळ, आकाश मंडलिक यांनी आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले

# पुरंदर तहसीलदारांकडून पर्यायी पालखीमार्गाची पाहणी ; काम दर्जेदार करण्याच्या ठेकेदाराला दिल्या सूचना

पुणे । प्रतिनिधी

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीतळ वाल्हेनजीक सुकलवाडी (ता. पुरंदर) येथून सुकलवाडी, झिरपवस्ती, कर्नलवाडी, गुळुंचे, दगडेवस्तीमार्गे निरा या पर्यायी पालखीमार्गाची तहसीलदार विक्रम राजपूत यांनी शुक्रवारी (दि. २०) पाहणी करून शेतकर्यांसोबत संवाद साधला. त्यांच्या अडचणी समजून घेत त्या सोडविण्याचा प्रयत्न केला. या मार्गाचे काम जलद गतीने करून उत्कृष्ट दर्जाचे करावे, अशा सूचना संबंधित ठेकेदारास तहसीलदार राजपूत यांनी दिल्या.



वाल्हे येथील पालखीतळावर पालखी मुक्कामी आल्यानंतर दुसर्या दिवशी पालखी निरेकडे मार्गस्थ होते. या वेळी वाहतुकीसाठी मोठा अडथळा निर्माण होता, ही बाब लक्षात घेऊन मागील काही वर्षांपासून सुकलवाडी, झिरपवस्ती, कर्नलवाडी, गुळुंचे, दगडेवस्तीमार्गे निरा या रस्त्याची चाचपणी झाली होती. हा पर्याय सोईस्कर वाटल्याने नुकतेच जिल्हा नियोजन मंडळातून एक कोटीचा निधी मंजूर झाला होता. यानंतर या पर्यायी पालखी महामार्गाचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र, शेतकर्यांच्या काही अडचणींमुळे काम थांबले होते. या वेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूने पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी गटारलाइन करून देण्याची विनंती शेतकर्यांनी केली होती. रस्त्याची रुंदी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंदाजपत्रकाप्रमाणे करून देण्यासंदर्भात सर्व शेतकरीवर्गाला सूचना देण्यात आल्या तसेच ओढ्याचे पूर्वीप्रमाणेच खोलीकरण करणे, जेणेकरून पाणी व्यवस्थित जाईल व रस्त्याचे नुकसान होणार नाही. शेतामध्ये जाण्यासाठीचे पारंपरिक रस्त्यांचे नुकसान न करता रस्ता मजबूत करून देणे व शेतातील पिकांना हानी पोहणार नाही, याचे आश्वासन ठेकेदारांकडून मिळाल्यानंतर संबंधित रस्त्याच्या कामास हरकत नसल्याचे शेतकर्यांतर्फे सुकलवाडी येथील सरपंच संदेश पवार यांनी सांगितले. या वेळी वागदरवाडीचे सरपंच सुनील पवार, सुकलवाडीचे माजी उपसरपंच धनंजय पवार, माजी तंटामुक्ती अध्यक्ष नारायण पवार, उद्योजक निखिल पवार, अतुल पवार, अशोक महाराज पवार, कोतवाल आनंद पवार, राजेंद्र चिकणे, साईनाथ चव्हाण, मारुती पवार, दिलीप पवार, बबन पवार, वनराज पवार, बाजीराव पवार, मनोज घाटे, विठ्ठल पवार आदींसह शेतकरी तसेच मंडलाधिकारी भारतकुमार भिसे, तलाठी सतीश उमाप, हवालदार भाऊसाहेब भोंगळे, ग्रामसेवक सोनाली जगदाळे, कोतवाल आनंद पवार आदी उपस्थित होते.